दैनिक
सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर | संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : शनिवार, ७ नोव्हेंबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ६ | वर्ष : १ | अंक : ३२८ | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग
अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

कॅबचालकाने सासरच्या ७ जणांना संपवले

पत्नी, सासू, २ मेहुणे, २ भावजय आणि ७ वर्षांच्या लहान मुलाच्या हत्येचा आरोप

वृत्तसंस्था, बंगळूरू

बंगळूरूमधून एक अत्यंत हादरवून टाकणारी घटना समोर आली आहे, ज्याने पोलिसांनाही चक्रावून सोडले आहे. इंदुशेखर असे आरोपी कॅब चालकाचे नाव असून, त्याच्यावर पत्नी, सासू, २ मेहुणे, २ भावजय आणि ७ वर्षांच्या लहान मुलाच्या हत्येचा आरोप आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, इंदुशेखरचे त्याची पत्नी सुनीता हिच्याशी वारंवार वाद होत असत. आरोपी या गोष्टीमुळे नाराज होता की, त्याची पत्नी सतत तिच्या माहेरच्या संपर्कात राहत असे. जेव्हा जेव्हा इंदुशेखर आपल्या पत्नीची तक्रार सासू आणि मेहुणे यांच्याकडे करत असे, तेव्हा ते सर्वजण नेहमी सुनीताचीच बाजू घ्यायचे. पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, हीच नाराजी हळूहळू एका भयानक कटात बदलली, ज्यामध्ये आरोपीने आपल्याच सासरच्या ७ जणांना संपवले.

प्राथमिक माहितीनुसार, आरोपीने सर्वप्रथम आपली पत्नी सुनीता हिची हत्या केली. त्यानंतर त्याने आपल्या दोन्ही मेहुण्यांना, शिवकुमार आणि शंकर यांना पार्टी देण्याच्या बहाण्याने घरी बोलावले. ज्या पार्टीच्या आमंत्रणावरून त्यांना बोलावले होते, त्यानंतर त्यांना संपवलं. याशिवाय आरोपीने आपली सासू रूपावती, दोन्ही भावजय दिव्या आणि नलिनी आणि ७ वर्षांचा पुनीत यांनाही आपले लक्ष्य बनवले. हत्या करण्यासाठी पाषाणाचा (दगड) वापर करण्यात आल्याचा पोलिसांना संशय आहे. पोलिसांच्या प्राथमिक तपासात आणखी एक धक्कादायक बाब समोर आली आहे.

हत्या केल्यानंतर इंदुशेखरने मृतदेह आपल्या कारमध्ये ठेवून वेगवेगळ्या ठिकाणी विल्हेवाट लावले, असा संशय आहे. रक्ताचे डाग पुसून टाकण्यासाठी आणि पुरावे नष्ट करण्यासाठी केमिकल्सचा वापर केल्याचा संशय पोलिसांना आहे. परंतु, या संपूर्ण प्रकरणात सर्वात मोठा प्रश्न हा आहे की, जर ७ खून झाले तर बाकीचे ६ मृतदेह कुठे आहेत? बंगळूरूमधील श्रीरामपुरा पोलीस ठाण्यात बेपत्ता असल्याबाबतची तक्रार दाखल झाल्यानंतर या प्रकरणाचा पर्दाफाश झाला.

तपासादरम्यान पोलिसांनी इंदुशेखरची कसून चौकशी केली, परंतु त्याच्या जबाबांमध्ये सतत विसंगती आढळू लागली. पोलिसांनुसार आरोपीने ७ जणांची हत्या केल्याची कबुली दिली आहे. आरोपीने दाखवलेल्या ठिकाणांच्या आधारे नंदी हिल्सच्या पायथ्याशी शोध मोहीम राबवण्यात आली. सुमारे ४ तास चाललेल्या या शोध मोहिमेत पोलिसांना ७ वर्षांच्या पुनीतचा मृतदेह सापडला, मात्र इतर ६ जणांचा अद्याप कोणताही पत्ता लागलेला नाही. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता, डीसीपी वेस्ट यांच्या नेतृत्वाखाली ३ विशेष पोलीस पथके स्थापन करण्यात आली आहेत. आरोपीने ७ हत्या केल्याची कबुली दिली असली, तरी सध्या केवळ एकच मृतदेह हाती आला असून, उर्वरित ६ जणांचा शोध सुरू आहे. पोलीस आरोपीच्या दाव्यांची पडताळणी करत कसून तपास करत आहेत.

बंगळूरूमधील सामूहिक हत्येची ही अत्यंत थरारक घटना आहे. आरोपी इंदुशेखर आपल्या पत्नीच्या वागणुकीमुळे खूप संतापलेला होता आणि जेव्हा जेव्हा त्याने आपल्या सासू-मेहुण्यांकडे याची तक्रार केली, तेव्हा त्यांनी पत्नी सुनीताचीच बाजू घेतली. यामुळे त्याने रागाच्या भरात पत्नी सुनीता आणि तिच्या कुटुंबातील ६ सदस्यांची हत्या केली.

मृत झालेल्यांमध्ये इंदुशेखरची पत्नी सुनीता, सासू रूपावती, मेहुणे शिवकुमार आणि शंकर, भावजय दिव्या आणि नलिनी,



शिवकुमारचा ७ वर्षांचा मुलगा पुनीत हे आहेत.

आरोपी इंदुशेखरने या हत्यांचा आधीच कट रचला होता. त्याने सर्वात आधी पत्नीला मारले. त्यानंतर दोन्ही मेहुण्यांना पार्टीच्या बहाण्याने घरी बोलावून त्यांची हत्या केली. त्यानंतर त्यांच्या पत्नी, सासू आणि ७ वर्षांच्या लहान मुलालाही त्याने संपवले. आरोपीने गुन्ह्यासाठी घरातील दगडाचा वापर केल्याचा आणि मृतदेह कारमध्ये घालून वेगवेगळ्या ठिकाणी फेकून दिल्याचे समोर आले आहे.

रक्ताचे डाग व पुरावे नष्ट करण्यासाठी त्याने रसायनांचा (केमिकल्स) वापर केला. कौटुंबिक वादातून हे हत्याकांड घडले असून श्रीरामपुरा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल झाल्यानंतर हे प्रकरण उजेडात आले. नंदी हिल्सच्या पायथ्याशी ४ तास चाललेल्या ऑपरेशनमध्ये ७ वर्षांच्या मुलाचा मृतदेह सापडला असून, उर्वरित मृतदेहांचा शोध घेण्यासाठी पोलिसांचे प्रयत्न अद्याप सुरू आहेत.

थोडक्यात

खिस लेनची शिक्षा ३ महिन्यांहून १ महिन्यावर

मेलबर्न : ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू खिस लेन याची कोकेन सेवन प्रकरणातील शिक्षा ३ महिन्यांवरून १ महिन्यापर्यंत कमी करण्यात आली आहे. इंग्लंडच्या क्रिकेट नियामकाने शुक्रवारी याची पुष्टी केली. ३६ वर्षीय लेन १८ जुलै रोजी इंग्लंडमध्ये झालेल्या टी २० ब्लास्ट फायनल्स डेदरम्यान करण्यात आलेल्या अँटी-डोपिंग चाचणीत दोषी आढळला होता. त्यावेळी तो नॉर्थहॅम्पटनशायरकडून खेळत होता.

क्रिकेट नियामकाने मान्य केले की लेन यांनी स्पर्धेबाहेर कोकेनचे सेवन केले होते. त्याचा खेळातील कामगिरी सुधारण्याशी कोणताही संबंध नव्हता. लेन यांनी पदार्थांच्या गैरवापरावरील पुनर्वसन कार्यक्रमही पूर्ण केला. या कारणांमुळे त्यांची सुरुवातीची ३ महिन्यांची शिक्षा कमी करून १ महिना करण्यात आली. त्यांनी निलंबनाचा कालावधी पूर्ण केला असून आता त्यांच्या खेळण्यावर कोणतीही बंदी नाही. १८ जुलै रोजी टी २० ब्लास्ट फायनल डे वेळी खिस लिन यांची नियमित अँटी-डोपिंग चाचणी करण्यात आली होती. त्या वेळी ते नॉर्थहॅम्पटनशायर स्टीलबॅक्स संघाचे प्रतिनिधित्व करत होते. त्यांच्या मूत्राच्या नमुन्याची तपासणी करण्यासाठी तो फ्रान्समधील वाडा मान्यताप्राप्त प्रयोगशाळेत पाठवण्यात आला होता.

जिल्हाधिकाऱ्यांची तत्परता; महसूल कर्मचाऱ्यांना दिवाळीत पदोन्नतीची भेट

विविध संवर्गातील ९९ कर्मचाऱ्यांना पदोन्नती

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

जिल्हाधिकाऱ्यांच्या आस्थापनेवरील महसूल सहायक, सहाय्यक महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी संवर्गातील पदोन्नती कोट्यात रिक्त असलेली पदे भरण्याकरीता जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या अध्यक्षतेखाली ५ नोव्हेंबर रोजी विभागीय पदोन्नती समितीची सभा घेण्यात आली, आणि आज दुसऱ्याच दिवशी दिवाळी निमित्ताने कर्मचाऱ्यांच्या हातात आदेश देऊन पदोन्नतीची अनोखी भेट त्यांना दिली.

महसूल कर्मचारी प्रशासनाचा कणा आहे. सद्या विविध प्रकारच्या कामात महसूल अधिकारी, कर्मचारी गुंतलेले आहेत. शेतकऱ्यांना मदत, टंचाई निवारण, दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासोबतच सर्वसामान्य नागरिकांना वर्षभर विविध प्रकारच्या शासकीय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी महसूल कर्मचाऱ्यांचा सातत्याने पुढाकार असतो. त्यामुळे विभागातील कर्मचाऱ्यांना वेळेवर पदोन्नती मिळाली पाहिजे, अशी जिल्हाधिकाऱ्यांची भूमिका आहे.त्यामुळे दिवाळीच्या पार्श्वभूमीवर पदोन्नतीची अनोखी भेट देण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी काल ५ नोव्हेंबर रोजी विभागीय पदोन्नती समितीची बैठक घेतली. बैठकीत पदोन्नतीच्या कोट्यातून रिक्त असलेल्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याचा निर्णय घेण्यात आला. यामध्ये शिपाई संवर्गातून महसूल सहायक संवर्गात ८ कर्मचाऱ्यांना, महसूल सहायक संवर्गातून सहाय्यक महसूल अधिकारी संवर्गात ५२ कर्मचाऱ्यांना, ग्राम महसूल अधिकारी संवर्गातून मंडळ अधिकारी संवर्गात ३९ कर्मचाऱ्यांना पदोन्नतीसाठी पात्र ठरविण्यात आले.

रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार ८ शिपाई कर्मचाऱ्यांना महसूल सहायक संवर्गात, १२ महसूल सहायक यांना सहाय्यक महसूल अधिकारी संवर्गात व ४ ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांना मंडळ अधिकारी संवर्गात पदोन्नती देण्यात येवून पदोन्नतीचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहे.

दिवाळीत कर्मचाऱ्यांच्या कष्टाची आणि सेवेची दखल घेत दिलेल्या 'पदोन्नती भेट'मुळे कर्मचाऱ्यांमध्ये आनंद आणि उत्साह निर्माण झाला आहे. या निर्णयक्षम व पुढाकाराबद्दल सर्व पदोन्नत कर्मचारी व महसूल संघटनेच्यावतीने आभार व्यक्त करण्यात आले.

कर्मभूमी एक्सप्रेसला भीषण आग

वृत्तसंस्था, पंजाब

पंजाबमधील पटियाला आणि राजपुरा दरम्यान आज एक मोठी रेल्वे दुर्घटना घडली आहे. सराई बंजारा येथे कर्मभूमी एक्सप्रेस रेल्वेच्या चार डब्यांना आग लागल्याची घटना घडली आहे. धावत्या ट्रेनला लागलेल्या आगीमुळे प्रवाशांमध्ये घबराट पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अनेक प्रवासी आगीत अडकले होते. आगीचे कारण आणि झालेल्या नुकसानीबद्दलची माहिती अद्याप मिळालेली नाही. ट्रेन पंजाबहून बिहारकडे जात असताना रेल्वेला भीषण आग लागल्याची घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, ही ट्रेन पंजाबहून बिहारकडे जात होती यावेळी पटियाला येथे या रेल्वेला भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. धुराचे लोट वेगाने पसरले आणि प्रवासी घाबरून खाली उतरू लागले. आगीचे अनेक भयानक व्हिडिओ सोशल मीडियावर समोर आले आहेत. दिवाळीसाठी रेल्वेगाड्या खचाखच भरलेल्या असतानाच हा अपघात घडला. कर्मभूमी एक्सप्रेसला आग लागल्याने प्रवासी चिंतेत आहेत. मात्र, कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही. सर्व प्रवासी वेळेवर उतरल्याने मोठा अनर्थ टळल्याची माहिती मिळत आहे.प्राथमिक माहितीनुसार, ट्रेनच्या इंजिनमधून पाचव्या डब्यापर्यंत धूर निघत असल्याचे दिसून आले. यानंतर रेल्वे प्रशासनाला या घटनेची माहिती देण्यात आली आणि अधिकारी व संबंधित कर्मचाऱ्यांना सतर्क करण्यात आले.

१०वी आणि १२वीच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने इयत्ता १०वी आणि १२वीच्या आगामी वार्षिक परीक्षांसाठीचे अधिकृत वेळापत्रक जाहीर केले आहे. मंडळाने दिलेल्या माहितीनुसार, १०वी आणि १२वी अशा दोन्ही वर्गांच्या मुख्य प्रात्यक्षिक व लेखी परीक्षा १६ फेब्रुवारी २०२७ पासून एकाच वेळी सुरू होणार आहेत. परीक्षांचे नियोजन अचूक व्हावे आणि विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी पुरेसा वेळ मिळावा, या उद्देशाने मंडळाने परीक्षा सुरू होण्याच्या तब्बल १०१ दिवस आधीच हे वेळापत्रक प्रसिद्ध केले आहे.

सीबीएसईने दिलेल्या माहितीनुसार, प्रात्यक्षिक परीक्षा आणि अंतर्गत मूल्यमापन १ जानेवारी २०२७ पासून शाळांच्या स्तरावर सुरू होणार आहे.

त्यानंतर मुख्य लेखी परीक्षांचे वेळापत्रक खालीलप्रमाणे असेलः

इयत्ता १०वी परीक्षा : १६ फेब्रुवारी ते ९ मार्च २०२७

इयत्ता १२वी परीक्षा : १६ फेब्रुवारी ते ९ एप्रिल २०२७परीक्षेची वेळ : सर्व विषयांचे पेपर्स एकाच सत्रात सकाळी १०.३० ते दुपारी १.३० या वेळेत पार पडतील.

पहिल्या दिवशी भौतिकशास्त्र अन् कला विषयांचा पेपर

परीक्षेच्या पहिल्याच दिवशी म्हणजेच १६ फेब्रुवारी २०२७ रोजी इयत्ता १२वीचा भौतिकशास्त्र विषयाचा महत्त्वाचा पेपर होणार आहे. तर १०वीचा पेंटिंग आणि इतर प्रादेशिक भाषांचा पेपर पार पडेल. त्यानंतर गणित, विज्ञान, सामाजिक शास्त्र, इंग्रजी, हिंदी, रसायनशास्त्र तसेच वाणिज्य व कला शाखेचे सर्व प्रमुख पेपर्स टप्प्याटप्प्याने पार पडतील. दोन पेपर्सच्या दरम्यान विद्यार्थ्यांना उजळणीसाठी पुरेसा वेळ देण्यात आला आहे.

या वर्षी सीबीएसई बोर्डाच्या परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. देशभरातून आणि परदेशातील सीबीएसई संलग्न शाळांमधून मिळून एकूण ४६.३ लाखांहून अधिक विद्यार्थी या परीक्षेला बसणार आहेत.





संपादकीय लेखणीतून...

पानीपत युद्ध

पानिपतची दुसरी लढाई ५ नोव्हेंबर १५५६ रोजी मुघल सम्राट अकबर आणि हिंदू राजा सम्राट हेमचंद्र विक्रमादित्य- हेमू यांच्यात झाली. काही आठवड्यांपूर्वीच हेमूने दिल्लीच्या लढाईत मुघल सैन्याचा पराभव करून दिल्ली आणि आग्रा जिंकले होते आणि स्वतःला राजा घोषित केले होते. अकबर त्यावेळी अल्पवयीन सुमारे १४ वर्षांचा होता आणि त्याच्या वतीने त्याचे सेनापती बैराम खान युद्धाचे सूत्र सांभाळत होते. युद्धादरम्यान हेमूचे सैन्य विजयाच्या जवळ पोहोचले होते, परंतु नेमक्या वेळी एका बाणाने हेमूच्या डोक्यात वर्मी घाव घातला, ज्यामुळे तो बेशुद्ध पडला. सेनापती पडल्यामुळे त्याच्या सैन्यात अचानक भगदड उडाली आणि मुघल सैन्याने या युद्धाचा पलटवार करून विजय मिळवला.

या युद्धामुळे भारतात मुघल साम्राज्याची सत्ता पुन्हा एकदा भक्कम झाली आणि अकबराचे राज्य सुरक्षित झाले. या युद्धाविषयी सविस्तर अधिकृत माहिती वाचण्यासाठी तुम्ही पानिपत जिल्हा प्रशासन संकेतस्थळ किंवा विकिपीडिया पानिपतची दुसरी लढाईला भेट देऊ शकता. पानिपतची दुसरी लढाई दि. ५ नोव्हेंबर १५५६ रोजी, दिल्लीतून उत्तर भारतावर राज्य करणाऱ्या हिंदू राजा सम्राट हेमचंद्र विक्रमादित्य- जे हेमू नावाने प्रसिद्ध होते आणि अकबराचे सैन्य यांच्यात लढली गेली. हा अकबराचे सेनापती खान जमान पहिला आणि बैराम खान यांचा निर्णायक विजय होता. दि. २४ जानेवारी १५५६ रोजी मुघल शासक हुमायून दिल्लीत मरण पावला आणि त्याचा मुलगा, अकबराला कलानौर जो केवळ तेरा वर्षांचा होता, तो गादीवर आला. दि.१४ फेब्रुवारी १५५६ रोजी अकबराचा राजा म्हणून राज्याभिषेक झाला. त्याच्या राज्यारोहणाच्या वेळी मुघल राजवट काबूल, कंदाहार, दिल्ली आणि पंजाबच्या काही भागांपुरती मर्यादित होती. अकबर त्यावेळी आपला पालक, बैराम खान याच्यासोबत काबूलमध्ये मोहिमेवर होता.

सम्राट हेमचंद्र विक्रमादित्य किंवा हेमू हा दिल्लीच्या लढाईत अकबर/हुमायूनच्या सैन्याचा पराभव करून दिल्लीचा हिंदू सम्राट बनला. हेमू सध्याच्या हरियाणातील रेवाडीचा रहिवासी होता, जो पूर्वी १५४५ ते १५५३ पर्यंत शेरशाह सुरीचा मुलगा इस्लाम शाहचा सल्लागार होता. १५५३ ते १५५६ या काळात इस्लाम शाहचा पंतप्रधान आणि सेनापती म्हणून हेमूने सूर राजवटीविरुद्ध अफगाण बंडखोरांनी केलेला उठाव दडपण्यासाठी २२ लढाया जिंकल्या होत्या. जानेवारी १५५६ मध्ये हुमायूनच्या मृत्यूच्या वेळी, हेमूने नुकतेच बंगालमधील बंड मोडून काढले होते आणि उद्धत बंगालचा शासक मुहम्मद शाहला ठार मारले होते. त्याने दिल्ली स्वतःसाठी जिंकण्याचा आपला इरादा आपल्या सेनापतींना कळवला. त्यानंतर त्याने संपूर्ण उत्तर भारतात लढाया जिंकत एक मोहीम सुरू केली. जेव्हा त्याने आग्रावर हल्ला केला, तेव्हा आग्रा येथील अकबराच्या सैन्याचा सेनापती लढाई न करताच पळून गेला. सध्याच्या बिहार आणि उत्तर प्रदेशचा समावेश असलेला इटावा, कालपी आणि आग्रा प्रांतांमधील एक मोठा प्रदेश हेमूच्या नियंत्रणाखाली आला. ग्वाल्हेर किल्ल्यात हेमूने अधिक हिंदूंची भरती करून आपले सैन्य मजबूत केले.

त्यानंतर हेमू दिल्लीच्या दिशेने निघाला आणि शहराबाहेर तुघलकाबाद येथे आपले सैन्य तैनात केले. दि. ६ ऑक्टोबर १५५६ रोजी सैन्याला मुघलांच्या प्रतिकाराचा सामना करावा लागला. एका भीषण लढाईनंतर अकबराच्या सैन्याचा पराभव झाला आणि मुघल सैन्याचा सेनापती तर्दी बेग पळून गेला, ज्यामुळे हेमूला दिल्ली ताब्यात येता आली. सुमारे ३००० मुघल मारले गेले. दि. ७ ऑक्टोबर १५५६ रोजी पुराणा किल्ला येथे हेमूचा राज्याभिषेक झाला आणि ३५० वर्षांच्या मुस्लिम राजवटीनंतर त्याने उत्तर भारतात हिंदू राजवट स्थापन केली. त्याला "सम्राट हेमचंद्र विक्रमादित्य" ही पदवी बहाल करण्यात आली. अकबरनामामध्ये अबुल फजलच्या मते, हेमू काबूलवर हल्ला करण्याची तयारी करत होता आणि त्याने आपल्या सैन्यात अनेक बदल केले होते.

दिल्ली आणि आग्रा येथील घडामोडींमुळे पंजाबमधील कलानौर येथे मुघल अस्वस्थ झाले. अनेक मुघल सेनापतींनी अकबराला काबूलला माघार घेण्याचा सल्ला दिला, कारण मुघल सैन्य हेमूच्या सामर्थ्याची आणि आपला देश स्वतंत्र करण्यासाठी हिंदूंमध्ये निर्माण झालेल्या नवीन जागृतीचा सामना करू शकणार नाही असे त्यांना वाटत होते, परंतु बैराम खानने युद्धाचा बाजूने निर्णय घेतला. अकबराचे सैन्य दिल्लीच्या दिशेने निघाले. ५ नोव्हेंबर रोजी दोन्ही सैन्य पानिपतच्या ऐतिहासिक रणांगणावर आमनेसामने आले, जिथे तीस वर्षांपूर्वी, अकबराचे आजोबा बाबरने इब्राहिम लोदीचा ऑटकष पराभव केला होता, जी लढाई आता पानिपतची पहिली लढाई म्हणून ओळखली जाते. एच. जी. कीन लिहितात; "अकबर आणि त्याचे पालक बैराम खान यांनी युद्धात भाग घेतला नाही आणि ते युद्धक्षेत्रापासून ५ कोस (८ मैल) दूर तैनात होते. बैराम खानने १३ वर्षांच्या बाल राजाला युद्धभूमीवर स्वतः उपस्थित राहण्याची परवानगी दिली नाही, त्याऐवजी त्याला ५००० सुप्रशिक्षित आणि अत्यंत विश्वासू सैनिकांचे विशेष संरक्षण पुरवण्यात आले आणि युद्धरेषेच्या खूप मागे सुरक्षित अंतरावर तैनात करण्यात आले.

'इतिहास घडला! अब्दुल अल-सय्यद यांचा अमेरिकेत विजय; काय आहे 'भारतीय कनेक्शन'?'

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल वर्धा

अमेरिकेच्या राजकीय आणि सामाजिक इतिहासात नुकतीच एक अत्यंत महत्त्वाची आणि लक्षवेधी घटना घडली आहे. अमेरिकन संसदेच्या वरिष्ठ सभागृहात अर्थात सिनेटमध्ये पहिल्यांदाच मुस्लिम लोकप्रतिनिधीने प्रवेश करत नवा इतिहास रचला आहे. मिशिगन प्रांतातून मिळवलेला हा विजय केवळ उमेदवाराचा नसून, तो अमेरिकेतील वाढत्या सामाजिक विविधतेचा आणि बदलत्या राजकीय समीकरणांचा ठळक पुरावा आहे. या विजयामुळे अमेरिकेच्या राजकारणातील नव्या पर्वाची सुरुवात झाली असून, प्रगतशील विचारांना मोठी चालना मिळाली आहे.

हा अभूतपूर्व विजय ३ नोव्हेंबर २०२६ रोजी पार पडलेल्या निवडणुकीत साकार झाला. डेमोक्रॅटिक पक्षाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या अब्दुल अल-सय्यद यांनी रिपब्लिकन पक्षाचे तगडे उमेदवार माईक रोजर्स यांचा अत्यंत अटीतटीच्या लढतीत पराभव केला. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासह अनेक कट्टरपंथी विरोधकांनी त्यांच्यावर धार्मिक आणि वैयक्तिक पातळीवर अत्यंत खालच्या थराला जाऊन टीका केली होती. त्यांच्या धार्मिक ओळखीवरून त्यांना सातत्याने लक्ष्य केले गेले. मात्र, या सर्व राजकीय वादळांना अत्यंत संयमाने तोंड देत त्यांनी मतदारांचा विश्वास जिंकला आणि या ऐतिहासिक विजयावर मोहोर उमटवली.

अब्दुल अल-सय्यद यांची राजकीय कारकीर्द जितकी रंजक आहे, तितकीच त्यांची शैक्षणिक आणि व्यावसायिक पार्श्वभूमीदेखील अत्यंत प्रभावी आहे. मूळच्या इजिप्तमधून अमेरिकेत स्थायिक झालेल्या मातापित्यांच्या पोटी जन्मलेल्या अल-सय्यद यांनी सुरुवातीपासूनच शिक्षणात आपली चमक दाखवली. त्यांनी मिशिगन विद्यापीठातून आपले पदवीचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर अत्यंत प्रतिष्ठेची मानली जाणारी 'रोड्स स्कॉलर ही शिष्यवृत्ती मिळवून त्यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठातून सार्वजनिक आरोग्य या विषयात डॉक्टरेट पदवी संपादन केली. यासोबतच कोलंबिया विद्यापीठातून त्यांनी वैद्यकीय क्षेत्रातील उच्च पदवीदेखील मिळवली आहे.

व्यवसायाने डॉक्टर आणि सार्वजनिक आरोग्य तज्ज्ञ असलेल्या अल-सय्यद यांनी मिशिगन प्रांतातील डेट्रॉईट शहरात आरोग्य विभागाची पुनर्बांधणी करण्याचे अत्यंत मोलाचे काम केले. तसेच, २०२३ ते २०२५ या कालावधीत त्यांनी वेन काउंटीच्या आरोग्य, मानवी आणि माजी सैनिक सेवा विभागाचे संचालक म्हणूनही उत्तम प्रशासकीय कामगिरी बजावली.

राजकीय दृष्ट्या ते डेमोक्रॅटिक पक्षातील अत्यंत प्रगतशील विचारसरणीचे नेते मानले जातात. त्यांच्या निवडणूक प्रचारात त्यांनी सर्वसामान्यांच्या जगण्याशी निगडित प्रश्नांवर भर दिला. सर्वांसाठी मोफत आणि सक्तीची आरोग्यसेवा, वाढत्या प्रदूषणाला आळा घालण्यासाठी पर्यावरण संरक्षण आणि मोठ्या उद्योगपतींच्या व्यावसायिक मक्तेदारीविरुद्ध कठोर कायदे या त्यांच्या प्रमुख मागण्या राहिल्या आहेत. समाजातील तळागाळातील लोकांना समान हक्क आणि सुविधा मिळाव्यात, यासाठी ते नेहमीच आग्रही राहिले आहेत.

या सर्व राजकीय आणि अमेरिकन पार्श्वभूमीसोबतच, अब्दुल अल-सय्यद यांचे भारताशी असलेले नाते अत्यंत विशेष आणि जिव्हाळ्याचे आहे. त्यांच्या पत्नी डॉ. सारा जुकाकू या मूळच्या भारतीय वंशाच्या आहेत. डॉ. सारा यांच्या कुटुंबाचे मूळ कर्नाटक राज्यातील भटकळ येथील असून, सध्या त्यांचे बहुतांश नातेवाईक बंगळुरू शहरात वास्तव्यास आहेत.

विशेष म्हणजे, सारा यांचे आजोबा जुकाकू शमसुद्दीन हे तत्कालीन म्हैसूर राज्याच्या मंत्रिमंडळात उप-मुख्यमंत्री या अत्यंत महत्त्वाच्या पदावर कार्यरत होते. लग्नानंतरची जवळपास २० वर्षे दक्षिण भारतीय कुटुंबाचा अविभाज्य भाग राहिल्यामुळे, अल-सय्यद स्वतःला अरब संस्कृतीपेक्षा भारतीय संस्कृतीच्या अधिक जवळचे मानतात. जाहीर मुलाखतीत त्यांनी अतिशय अभिमानाने नमूद केले होते की, त्यांच्या खाण्यापिण्याच्या आणि राहणीमानाच्या सवयी पाहता ते पूर्णपणे भारतीयासारखेच जीवन जगतात.

या विजयाचा भारत-अमेरिका संबंधांवर थेट आणि तात्काळ मोठा परिणाम होणार नसला, तरी दीर्घकालीन दृष्टिकोनातून हा विजय भारतासाठी लक्षणीय ठरू शकतो. अमेरिकन संसदेत आता भारतीय संस्कृतीची सखोल जाण असलेला, येथील कौटुंबिक आणि सामाजिक मूल्ये समजणारा महत्त्वाचा लोकप्रतिनिधी पोहोचला आहे. यामुळे मवाळ कूटनीतीच्या माध्यमातून भारताला आपली बाजू मांडण्यासाठी अनुकूल वातावरण मिळू शकते.

अल-सय्यद यांनी संसदेच्या परराष्ट्र संबंध समितीत काम करण्याची तीव्र इच्छा व्यक्त केली आहे. जर त्यांना या समितीत महत्त्वाचे स्थान मिळाले, तर अमेरिकेचे आशिया खंडातील परराष्ट्र धोरण आणि विशेषतः भारत-अमेरिका राजनैतिक संबंधांवर ते मोठा प्रभाव पाडू शकतात. तसेच, मानवाधिकार आणि अल्पसंख्याकांच्या हक्कांबद्दल ते अतिशय संवेदनशील आणि आक्रमक असल्याने, भविष्यात या मुद्द्यांवरून अमेरिकन धोरणांमध्ये त्यांचे विचार निर्णायक भूमिका बजावू शकतात. एकूणच, हा विजय अमेरिकेच्या अंतर्गत राजकारणातील स्थित्यंतर तर आहेच, शिवाय जागतिक राजकारणात आणि विशेषतः भारताच्या अनुषंगाने अनेक नव्या शक्यतांना जन्म देणारा ऐतिहासिक टप्पा ठरला आहे.

अब्दुल अल-सय्यद यांचा विजय हा केवळ निवडणुकीच्या निकालापुरता मर्यादित नाही; तो विविधतेतून लोकशाहीची ताकद वाढते, प्रतिनिधित्वातून विश्वास निर्माण होतो आणि नव्या पिढीच्या नेतृत्वातून राजकारणाची दिशा बदलू शकते, याचा महत्त्वपूर्ण संदेश देणारा क्षण आहे. अमेरिकन राजकारणातील हा नवा अध्याय भविष्यातील राजकीय समीकरणांवर किती परिणाम करेल, हे काळ ठरवेल; मात्र इतिहासाच्या पानांवर या विजयाने निश्चितच एक वेगळी आणि उल्लेखनीय नोंद केली आहे.

- ९५६१५१४३०६

अंशुल कंबोजची फिनिक्स भरारी!

डॉ.दत्ता विघावे क्रिकेट समिक्षक

एका वेगवान गोलंदाजाने केवळ वेगाने गोलंदाजी करणे पुरेसे नाही. प्रत्येक फलंदाजाला कोणत्या प्रकारचा चेंडू टाकायचा हे देखील त्याला माहित असले पाहिजे. भारतीय वेगवान गोलंदाज अंशुल कंबोजने न्यूझीलंडविरुद्ध ऑकलंडमध्ये झालेल्या एकदिवसीय सामन्यात हे दाखवून दिले. हरियाणाच्या या २५ वर्षीय गोलंदाजाने १० षटकांत केवळ २२ धावा दिल्या आणि दोन बळी घेतले. त्याने दोन निर्धाव षटकेही टाकली. त्याची सातत्यपूर्ण टप्पा आणि दिशा हे यामागील मुख्य कारण होते. ही कामगिरी महत्त्वपूर्ण आहे, कारण काही महिन्यांपूर्वी मँचेस्टर कसोटीत अंशुल त्याच्या नेहमीच्या गतीपेक्षा खूपच कमी वेगाने गोलंदाजी करत होता. त्याचा पहिला आंतरराष्ट्रीय अनुभव फारसा यशस्वी ठरला नव्हता. तथापि, संघ व्यवस्थापनाने त्याला एक-दोन खराब सामन्यांच्या आधारावर बाजूला सारण्याऐवजी सुधारण्याची संधी दिली. अंशुलने आपल्या तंत्रावरही काम केले आणि ऑकलंडमध्ये त्याचे फळ त्याला मिळाले. मँचेस्टर कसोटीत तो ताशी १२५ किलोमीटरच्या वेगावर अडकला होता.

अंशुलच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीची सुरुवात सोपी नव्हती. जुलै २०२५ मध्ये इंग्लंडविरुद्ध मँचेस्टर येथे होणाऱ्या कसोटी सामन्यासाठी जखमी आकाशदीप सिंगच्या जागी त्याचा संघात समावेश करण्यात आला. सरावादरम्यान आकाशदीपच्या बोटाला दुखापत झाल्याने तो चौथ्या कसोटीसाठी अनुपलब्ध होता. भारतीय संघाला अंशुलकडून ताशी १३५ ते १४० किलोमीटर वेगाने गोलंदाजीची अपेक्षा होती. तथापि, मँचेस्टरमध्ये त्याची गोलंदाजी ताशी सुमारे १२५ किलोमीटर वेगाने राहिली. त्याचे बालपणीचे प्रशिक्षक, सतीश राणा, हेदेखील या कामगिरीमुळे आश्चर्यचकित झाले होते. समस्या केवळ लाईन आणि लेंथची नव्हती. प्रशिक्षकाने मँचेस्टरमधील व्हिडिओ पाहिले आणि त्यांच्या लक्षात आले की अंशुलचा रन-अप ताळमेळात नव्हता. अंशुलने २३ जुलै, २०२५ रोजी कसोटी पदार्पण केले.

प्रशिक्षकाने त्याचा रन-अप कमी केला आणि त्यानंतर त्याला त्याच लांबीवर तासनतास सराव करायला लावला. मँचेस्टरमधील खराब कामगिरीनंतर, अंशुल आणि त्याच्या प्रशिक्षकाने त्याच्या गोलंदाजीच्या मूलभूत गोष्टींवर काम करण्यास सुरुवात केली. प्रशिक्षकाने त्याचा रन-अप सुमारे दोन यार्डने कमी केला. यानंतर फिटनेसवर काम करण्यात आले. त्यानंतर अंशुलने तासनतास एकाच लांबीवर गोलंदाजी केली. देशांतर्गत क्रिकेटने त्याला भारतीय संघात स्थान मिळवून दिले. अंशुलचा जन्म ६ डिसेंबर २००० रोजी हरियाणातील कर्नाल येथे झाला. तो उजव्या हाताने फलंदाजी करतो आणि उजव्या हाताने वेगवान-मध्यम गतीने गोलंदाजी करतो. फेब्रुवारी २०२२ मध्ये, त्याने रणजी ट्रॉफीमध्ये हरियाणासाठी देशांतर्गत पदार्पण केले. २०२३-२४ च्या विजय हजारे ट्रॉफीमध्ये त्याने १० सामन्यांमध्ये १७ बळी घेतले. त्या हंगामात हरियाणाने प्रथमच ही स्पर्धा जिंकली. नोव्हेंबर २०२४ मध्ये, अंशुलने रणजी ट्रॉफीमध्ये केरळविरुद्ध एका डावात सर्व १० बळी घेऊन इतिहास रचला. त्याने ४९ धावांत १० बळी घेतले आणि रणजी ट्रॉफीच्या इतिहासात एका डावात १० बळी घेणारा तो तिसरा गोलंदाज ठरला. आयपीएल २०२४ मध्ये मुंबई इंडियन्सने त्याला करारबद्ध केले. नंतर तो चेन्नई सुपर किंग्समध्ये सामील झाला. वेस्ट इंडिजविरुद्धच्या खराब कामगिरीनंतरही गिलने अंशुलला पाठिंबा दिला.

मँचेस्टर कसोटीनंतर अंशुलला एकदिवसीय क्रिकेटमध्येही संधी मिळाली. त्याने ऑक्टोबर २०२६ मध्ये वेस्ट इंडिजविरुद्ध एकदिवसीय पदार्पण केले. तथापि, या फॉरमॅटमधील त्याची सुरुवातीची कामगिरीही अपेक्षेप्रमाणे नव्हती. गुवाहाटीमध्ये खेळल्या गेलेल्या सामन्यात वेस्ट इंडिजच्या फलंदाजांनी त्याच्या गोलंदाजीवर धावा केल्या. यावेळी कर्णधार शुभमन गिलने त्याला पाठिंबा दिला. गिल म्हणाला की, संघात सामील झाल्यानंतर लगेचच खेळाडूसाठी चांगली कामगिरी करणे सोपे नसते. अंशुल आणि आकिब नबी हे असे गोलंदाज आहेत ज्यांना संघ भविष्यात संधी देऊ इच्छितो. गिलने अंशुलच्या आणखी एका वैशिष्ट्यावर प्रकाश टाकला. तो म्हणाला की अंशुल आठव्या क्रमांकावरही फलंदाजी करू शकतो, जे संघासाठी एक अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. अंशुल कंबोजला विराट कोहलीने एकदिवसीय पदार्पणाची संधी दिली.

पहिल्यांदाच त्याला न्यूझीलंड दौऱ्याची तयारी करण्यासाठी पूर्ण वेळ मिळाला. ऑकलंडमधील अंशुलची तयारी त्याच्या आधीच्या सामन्यांपेक्षा वेगळी होती. यावेळी, दुखापतग्रस्त खेळाडूच्या जागी त्याला अचानक बोलावण्यात आले नव्हते. न्यूझीलंड दौऱ्यावर इंडिया 'अ' संघासोबत एक कसोटी सामना खेळल्यानंतर तो वरिष्ठ संघात सामील झाला. ३१ ऑक्टोबर रोजी लिंकनहून ऑकलंडला पोहोचल्यानंतर त्याला सरावासाठी पुरेसा वेळ मिळाला.

पहिल्या स्पेलमध्ये एकही बळी नाही, पण फलंदाजांना रोखून धरले

न्यूझीलंडविरुद्धच्या सामन्यात, कर्णधार शुभमन गिलने आठव्या षटकात अंशुलकडे चेंडू सोपवला. त्याच्या पहिल्या स्पेलमध्ये पाच षटके होती, ज्यात त्याने फक्त १२ धावा दिल्या आणि एक निर्धाव षटक टाकले, पण एकही बळी मिळाला नाही. जेव्हा अंशुल गोलंदाजीसाठी परतला, तेव्हा त्याचा वेग वाढला. त्याने ताशी सुमारे १४० किलोमीटर वेगाने गोलंदाजी करण्यास सुरुवात केली. त्याने न्यूझीलंडचा कर्णधार मिचेल सँटनरला बाद केले. पुढच्याच षटकात नॅथन स्मिथ बाद झाला. स्लिपमध्ये झेप घेऊन विराट कोहलीने स्मिथचा झेल घेतला.

वॉबल सीम बॉल आणि अचूक टप्प्यावर विश्वास

सामन्यानंतर, 'प्लेअर ऑफ द मॅच' ठरलेल्या अंशुलने आपल्या गोलंदाजीच्या रणनीतीबद्दल सांगितले. तो म्हणाला की, खेळपट्टीच्या हालचालींवर अवलंबून राहण्याऐवजी, सातत्याने योग्य दिशा आणि टप्पावर गोलंदाजी करण्यावर त्याचे लक्ष केंद्रित होते. त्याच्या मते, त्या दिवशी वॉबल सीम बॉलने चांगली कामगिरी केली आणि त्याला खेळपट्टीवरून चांगला बाऊन्सही मिळत होता. वॉबल सीम बॉलमध्ये, सीम सरळ राहत नाही; त्याऐवजी, ती हवेत किंवा खेळपट्टीवर आदळताना किंचित डगमगू शकते. यामुळे फलंदाजाला चेंडू जमिनीवर आदळल्यानंतर कोणती दिशा घेईल याचा अंदाज लावणे कठीण होते.

एक सामना कारकीर्द ठरवत नाही - अंशुल

अंशुल सामन्यानंतर म्हणाला की, एक सामना खेळाडूची कारकीर्द ठरवत नाही. त्याने स्पष्ट केले की तो पूर्वीपासून अशाच गोष्टी करत आला आहे आणि मँचेस्टर कसोटीनंतर चांगली कामगिरी करण्यासाठी त्याला प्रेरणा मिळाली.

- ९०९६३७२०८२

शकुंतला देवी : ह्यूमन कॉम्प्युटर- मानवी संगणक

कृष्णकुमार निकोडे गडचिरोली

शकुंतला देवी (४ नोव्हेंबर १९२९ - २१ एप्रिल २०१३) या एक प्रसिद्ध भारतीय गणितज्ञ आणि "ह्यूमन कॉम्प्युटर- मानवी संगणक" म्हणून जगभर ओळखल्या जाणाऱ्या विदुषी होत्या. त्यांच्या प्रेरणादायी आयुष्यावर आधारित "शकुंतला देवी" हा चरित्रात्मक चित्रपट सन २०२० मध्ये प्रदर्शित झाला होता, ज्यात अभिनेत्री विद्या बालन यांनी त्यांची मुख्य भूमिका साकारली होती.

जन्म व बालपण- शकुंतला देवी यांचा जन्म दि. ४ नोव्हेंबर १९२९ रोजी बंगळुरू- बंगलोर येथे झाला. गरिबीमुळे त्यांना औपचारिक शालेय किंवा उच्च शिक्षण घेता आले नाही. अदभुत गणितीय प्रतिभा- वयाच्या अवघ्या तिसऱ्या वर्षी त्या वडिलांसोबत पत्ते खेळताना आकड्यांची किमया ओळखू लागल्या होत्या. वयाच्या ६ व्या वर्षी त्यांनी म्हैसूर विद्यापीठात आपल्या गणिताची प्रात्यक्षिके दाखवली. सन १९७७ मध्ये डलास विद्यापीठात त्यांनी "युनिव्हॅक" या संगणकापेक्षाही वेगाने २०१ अंकी संख्येचे २३ वे मूळ अवघ्या ५० सेकंदात शोधून काढले. दि. १८ जून १९८० रोजी इम्पीरियल कॉलेज, लंडन येथे १३ अंकी दोन वेगवेगळ्या संख्यांचा गुणाकार त्यांनी केवळ २८ सेकंदांत करून दाखवला, ज्याची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्समध्ये नोंद झाली. इतर कार्य- गणिता शिवाय त्यांनी ज्योतिषशास्त्र, कोडी, पाककृती आणि मर्डर मिस्ट्रीवर पुस्तके लिहिली. सन १९७७ मध्ये त्यांनी "द वर्ल्ड ऑफ होमोसेक्शुअल" हे पुस्तक लिहिले, जे भारतात समलैंगिकतेवर लिहिलेले पहिले पुस्तक मानले जाते. चित्रपट- त्यांच्या प्रेरणादायी आयुष्यावर आधारित "शकुंतला देवी" हा चरित्रात्मक चित्रपट सन २०२० मध्ये प्रदर्शित झाला होता, ज्यात अभिनेत्री विद्या बालन यांनी त्यांची मुख्य भूमिका साकारली होती.

धुरंधर शकुंतला देवीः शाळेचे तोंड न पाहता संगणकाची परीक्षा पाहणाऱ्या अन् गणिताला खेळ मानणाऱ्या कानडी महिलेची जादूई कहाणी.

सन १९८८ चा एक दिवस... टेक्सास विद्यापीठाच्या गोऱ्या प्राध्यापकांनी गणिताचे एक क्लिष्ट कोडे फळ्यावर लिहिले. हे महाअवघड कोडे पाहून सभागृहात शांतता पसरली. सर्वजण एकमेकांकडे पाहू लागले. स्वतः प्रोफेसर आपल्या कॅल्क्युलेटरकडे पाहत होते. पण त्याचवेळी एक भारतीय महिला हसत उभी राहिली आणि म्हणाली, "५४६३७२८९१..." प्राध्यापक अन् त्यांचे कॅल्क्युलेटरही थक्क झाले. या महिलेने अवघ्या ५० सेकंदांत हे गणित सोडवले होते. ते ही कोणत्याही कागद - पेन किंवा कॅल्क्युलेटरशिवाय... तिचे उत्तर ऐकून सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला... या महिलेचे नाव होते शकुंतला देवी. ही घटना टेक्सासमध्ये घडली. पण त्यापूर्वीच शकुंतला देवीची जादूई कहाणी सुरू झाली होती....

"गणित म्हणजे भीती नाही, खेळ आहे आणि खेळात जिंकायचे असेल, तर स्वतःला आव्हान द्या." असे शकुंतला देवीचे प्रांजळ मत होते.

शकुंतला देवी यांचा जन्म दि. ४ नोव्हेंबर १९२९ रोजी बंगळुरूतील एका पारंपरिक कन्नड ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सी व्ही सुंदराजा राव, तर आईचे नाव भुवनेश्वरी देवी होते. त्यांना ४ मुले होती. शकुंतला त्यांचे सर्वात थोरले किंवा मधले मूल असावे असे सांगितले जाते. त्याविषयी फारशी माहिती उपलब्ध नाही. पण त्यांचे वडील नव्या युगातले होते. त्यांनी आपल्या कुटुंबाचा पारंपरिक व्यवसाय असणाऱ्या पुजारीपणाकडे दुर्लक्ष करत सर्कसची आडवाटेवरची नोकरी पत्करली.

शकुंतला देवींचे सन १९६० मध्ये वयाच्या ३१ व्या वर्षी परितोष बॅनर्जी नामक एका अधिकाऱ्याशी लग्न झाले. हा अधिकारी कलकत्ता पोर्ट ट्रस्टमध्ये मोठ्या पदावर होता. या दाम्पत्याला अनुपमा नामक एक मुलगी झाली. शकुंतला यांचे जग स्वतंत्र व फिरते होते. याऊलट परितोष यांचे जीवन सरकारी नियमांच्या बाहेर नव्हते. त्यामुळे या दोघांचे लग्न केवळ १९ वर्षे टिकले. सन १९७९ साली त्यांचा घटस्फोट झाला. हे लग्न मोडल्यानंतर शकुंतला यांनी दुसरे लग्न केले नाही. त्यामुळे आपली संपूर्ण हयात अनुपमा यांच्या पालपोषणातच घालवली.

शकुंतला यांना आपल्या घटस्फोटाचा केव्हाच पश्चाताप झाला नाही. उलट मी माझ्या मनासारखे जगले, असे त्या अभिमानाने सांगायच्या.

वेगवान संगणकांनाही मागे टाकत- शकुंतला देवी गुणाकार, भागाकार, वर्ग व वर्गमूळ काढण्यासारख्या सर्वच प्रश्नांचे उत्तर क्षणात देत असत. मागील शतकातील कोणत्याही आठवड्यातील कोणत्याही दिवसाची तारीख त्या क्षणार्धात देत होत्या. या प्रकरणी त्या त्यावेळच्या सर्वात वेगवान संगणकांनाही मागे टाकत होत्या. त्यांचे हे कौशल्य पाहून अनेक देश त्यांना निमंत्रित करत होते. जानेवारी १९७७ साली शकुंतला देवी यांनी टेक्सास स्थित सदर्न मेथॉडिस्ट युनिव्हर्सिटीत २०१ अंकाच्या संख्येचे २३ वे मूळ अवघ्या ५० सेकंदांत काढले होते. त्याचे अचूक उत्तर ५४६३७२८९१ हे होते. त्यावेळी यूनिलॅक नामक संगणक सर्वात वेगवान होते. त्याने हे उत्तर देण्यासाठी ६२ सेकंदांचा वेळ व १३००० अनुदेशांची मदत घेतली होती.

- ९४२३७१४८८३

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

ऑग्रोव्हिजन राष्ट्रीय कृषी प्रदर्शनीच्या स्थळाचे महापौर नीता ठाकरे यांच्या हस्ते भूमिपूजन

दुष्काळावर मात करण्यासाठी पीक नियोजन, जलव्यवस्थापनावर राहणार विशेष भर

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

ऑग्रोव्हिजन राष्ट्रीय कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून दरवर्षी विदर्भासह महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना आधुनिक शेती, नवीन तंत्रज्ञान आणि कृषी क्षेत्रातील बदलांची माहिती मिळते. यंदा दुष्काळाच्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी कमी पाण्यात शेतीचे नियोजन, जलव्यवस्थापन आणि पीक नियोजन या विषयांवर विशेष भर देण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापौर नीता ठाकरे यांनी केले.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या पुढाकारातून येत्या २७ ते ३० नोव्हेंबर दरम्यान १७ वे ऑग्रोव्हिजन - राष्ट्रीय कृषी प्रदर्शन, कार्यशाळा आणि



परिषदेचे आयोजन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ ग्राउंड अमरावती रोड येथे करण्यात येणार आहे. या प्रदर्शनच्या स्थळाचे भूमीपूजन आज ०६ नोव्हेंबर रोजी नागपूरच्या महापौर नीता ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. अखिलेश पेशवे, महापालिकेच्या धरमपेठ झोन च्या सभापती धनश्री देशपांडे, ऑग्रोव्हिजन सल्लागार समितीचे अध्यक्ष डॉ. सी. डी. मायी, आयोजन सचिव रवी बोरटकर, रमेश मानकर यांच्यासह माजी आमदार मनोहर चंद्रिकापुरे, डॉ. कॅप्टन एल. बी. कलंत्री, शिरीष भगत, डॉ. हितेंद्र सिंग, डॉ. पिनाक दंदे, डॉ सुनील सहातपुरे, दिनेश ठाकरे, अशोक धोटे, प्रवीण भालेराव, नितीन कुलकर्णी, दत्ता जामदार, डॉ विनोद राऊत, शरद डोणेकर, विनय दाणी, विवेक भुते, अशोक म्हस्के, आनंद कदम, विजय तापडकर, शिवकुमार पाटील - एनडीडीबी, उपस्थित होते.

शेतकऱ्यांना आधुनिक शेतीची दिशा देणारा हा उपक्रम आज राष्ट्रीय स्तरावर विस्तारला असून, दरवर्षी लाखो शेतकरी या प्रदर्शनाला भेट देतात.

नेहमीप्रमाणे यंदाही राष्ट्रीय कृषी प्रदर्शनासाठी ३ मोठे हँगर उभारण्यात येणार असुन मोठ्या यंत्र व अवजारांकरिता मोठी जागा राखीव ठेवलेली आहे. ऑग्रोव्हिजन २०२६ ला MSME कडून मान्यता प्राप्त झाली असून यात स्टार्टअप्स व MSME चे विशेष दालन असणार आहे. प्रदर्शनात ४५० हून अधिक प्रतिष्ठित कंपन्या आणि कृषी संस्थांचा सहभाग अपेक्षित आहे. कृषी उपकरणे, आधुनिक तंत्रज्ञान आणि शेतीशी संबंधित विविध उत्पादनांची माहिती शेतकऱ्यांना एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे.

शेतकऱ्यांसाठी ३० कार्यशाळा

महाराष्ट्रातील दुष्काळ परिस्थिती लक्षात घेता पाण्याचे व्यवस्थापन व पीक नियोजन, एआयचा वापर करून कमी पाण्यात फळबाग व ऊस, कापूस याची शेती तसेच जोड धंद्यांवर कार्यशाळांमध्ये विशेष भर देण्यात येणार आहे. अश्या ३० विविध विषयांवर शेतकऱ्यांना तज्ञाचे मार्गदर्शन मिळणार असून शेतीत महिलांचा सहभाग यावर कार्यशाळा घेण्यात येणार आहे. ऑग्रोव्हिजन मधून शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देण्यासोबतच शेती अधिक फायदेशीर आणि शाश्वत करण्यासाठी मार्गदर्शन केले जाणार आहे.

अधिक माहितीसाठी आणि ऑग्रोव्हिजनमध्ये सहभाग नोंदविण्यासाठी ऑग्रोव्हिजन सचिवालय, गोविंद अपार्टमेंट्स, शंकरनगर, नागपूर येथे संपर्क साधता येईल.

थोडक्यात

दत्तात्रय नगर उद्यानात 'दिवाळी पहाट' कार्यक्रम उत्साहात संपन्न



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

दक्षिण नागपूर परिसरातील दत्तात्रय नगर येथील संत ज्ञानेश्वर उद्यानात दिवाळीनिमित्त आयोजित करण्यात आलेला दिवाळी पहाट हा सुरेल संगीताचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. पहाटेच्या प्रसन्न वातावरणात सादर झालेल्या संगीताच्या सुरांनी उपस्थित रसिकांना मंत्रमुग्ध केले. या कार्यक्रमाचे संगीत संयोजन वसुंधरा म्युझिक आणि विक्रम मोरे यांनी केले होते. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे महासचिव गिरीश पांडव, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे प्रवक्ते अतुल लोंढे, नागपूर महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते संजय महाकाळकर, माजी नगरसेवक तथा स्थायी समितीचे माजी अध्यक्ष दीपक कापसे, नगरसेवक सुहास नानवटकर, महेश बांते, किशोर गीद, महिला काँग्रेसच्या रोमा चौधरी, निलेश चंद्रिकापुरे, प्रवीण विघरे, अंशुल जिचकार यांच्यासह परिसरातील ज्येष्ठ नागरिक, महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संगीतमय वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

जुगार अड्डयावर पोलिसांचा छापा, ८ जणांवर गुन्हा

४ लाख ५ हजारांचा मुद्देमाल जप्त, सात दुचाकी आणि चार मोबाईल पोलिसांच्या ताब्यात



दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर

तालुक्यातील गोंडबोरी नदीजवळील पाण्याच्या टाकी परिसरात सुरू असलेल्या अवैध जुगार अड्डयावर पोलिसांनी छापा टाकून कारवाई केली. या कारवाईत जुगार खेळण्याचा पाच जणांसह अन्य तिघांविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी ४ लाख ५ हजार ३३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ५ नोव्हेंबर रोजी गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी संबंधित ठिकाणी धाड टाकली. यावेळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा साहाय्याने जुगार खेळताना आढळून आले. पोलिसांनी घटनास्थळावरून रामकुमार मनिराम कुशवाह (वय ३६), सुनील डोमाजी लाटकर (वय ३२), आकाश कृष्णाजी शेंडे (वय २९), अतुल अरविंद मानवकर (वय २२) आणि सर्वेकत शास्त्री भोयर (वय २०) यांना ताब्यात घेतले. याशिवाय अन्य तिघाविरुद्धही गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

या कारवाईत ५२ ताशपत्ते, रोख रक्कम, सात मोटारसायकली, चार मोबाईल आणि इतर साहित्य असा एकूण ४ लाख ५ हजार ३३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी आरोपींविरुद्ध कलम १२ महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सावनेर तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत जि.प.शाळा सिल्लोरी अव्वल



दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव मिळावा, त्यांच्यातील आत्मविश्वास वाढवा आणि विचार प्रभावीपणे मांडण्याची क्षमता विकसित व्हावी या उद्देशाने नागपूर जिल्हा परिषद अंतर्गत नगर परिषद शाळा, सावनेर येथे "माझा आवाज जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा" नुकतीच आयोजित करण्यात आली होती. या वक्तृत्व स्पर्धेत अनेक शाळांनी भाग घेतला, तालुकास्तरावर आयोजित करण्यात आलेल्या या वक्तृत्व स्पर्धेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सिल्लोरीची विद्यार्थिनी कु.निहारिका दिनेश मेश्राम हिने गट 'अ' मधून जिल्हा परिषद व्यवस्थापन गटात प्रथम क्रमांक पटकावून शाळेचा नावलौकिक वाढविला आहे. ती इयत्ता तिसरीमध्ये शिकत असून, एवढ्या लहान वयात तिने मिळविलेल्या या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.

तिच्या या यशामागे शिक्षकांचे मार्गदर्शन व मेहनत महत्त्वपूर्ण ठरली आहे. निहारिकाच्या यशाबद्दल सावनेर पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी अभिजीत कावरे, शिक्षण विस्तार अधिकारी कश्यप सावरकर, पुरुषोत्तम मुंडे, जितेंद्र ठाकरे,केंद्रप्रमुख अमोल राठोड,शाळेचे मुख्याध्यापक श्याम बालपांडे व मार्गदर्शक शिक्षक गुणवंत खोरगडे, सर्व पाटण सावंगी केंद्रातील शिक्षकवृंद, शाळा व्यवस्थापन समिती तसेच पालकांनी तिचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. निहारिकाच्या या यशामुळे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सिल्लोरीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

ऑक्सिजन सिलिंडर चोरीच्या आंतरजिल्हा गुन्हेगारीचा पर्दाफाश

लातूर : लातूर जिल्ह्यात विविध ठिकाणी ऑक्सिजन सिलेंडरच्या लोखंडी टाक्या चोरी करून त्यांची विक्री करणाऱ्या आरोपीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. या कारवाईत २० ऑक्सिजन सिलेंडरच्या लोखंडी टाक्या, चोरीच्या ५१ सिलेंडर विक्रीतून मिळालेली १ लाख ७७ हजार रुपये रोख रक्कम आणि गुन्ह्यात वापरलेली बोलेरो पिकअप असाह्या १४ लाख ५७ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे लातूर जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांसह नांदेड जिल्ह्यातील मुखेड पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या ११ गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश आले आहे.

निमा नागपूर द्वारा धन्वंतरी जयंती गणमान्य चिकित्सकांच्या सन्मानाने उत्साहात संपन्न



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

"आयुर्वेद उत्थानासाठी चिकित्सकांना भेडसावणाऱ्या अनेक विविध समस्यांचे निराकरण करणे अत्यंत गरजेचे आहे"असे प्रतिपादन विधानसभा परिषद पदवीधर मतदार संघाचे आमदार अभिजीत वंजारी यांनी स्थानिक श्री आयुर्वेद महाविद्यालयात आयोजित नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन "निमा" नागपूरद्वारा धन्वंतरी जयंती प्रित्यर्थ ज्येष्ठ वैद्यकीय चिकित्सकांच्या सत्कारप्रसंगी केले.अध्यक्षस्थानी डॉ.मनोहर जुमळे, माजी प्राचार्य तर विशेष अतिथी म्हणून संजय महाकाळकर, विरोधी पक्षनेता मनपा नागपूर हे होते.

'निमा'नागपूरचे अध्यक्ष डॉ. नितीन कान्होलकर यांनी स्वागतपर भाषण दिल्यानंतर,'केंद्रीय निमा'चे सल्लागार डॉ.रवींद्र बोथरा यांनी आपल्या प्रास्ताविकातून आयुर्वेद चिकित्सकांचे प्रश्न मांडत,कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला.त्यानंतर विधान परिषद पदवीधर मतदार संघावर नवनिर्वाचित आमदार अभिजीत वंजारी यांचा शाल- श्रीफळ-पुष्पगुच्छ-स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. तदनंतर वीस वर्षापेक्षा अधिक काळ जनसामान्यांना वैद्यकीय सेवा देणाऱ्या डॉ.बलराम रामभाऊ काकपुरे, डॉ.रमेश नारायणराव वारजूकर, डॉ. मनोज निंबाळकर,डॉ.श्रद्धा सुशांत साखरे, डॉ. रूपाली प्रवीण डांगोरे,डॉ.शितल मोहन येंडे, या गणमान्य चिकित्सकांचा शाल-स्मृतीचिन्ह पुष्पगुच्छ देऊन "धन्वंतरी सन्मान"प्रदान करण्यात आला. याप्रसंगी मनपा नागपूरचे विरोधी पक्षनेता संजय महाकाळकर यांनीसुद्धा आपल्या भाषणातून मनपा नागपूर स्तरावर वैद्यकीय चिकित्सकांच्या समस्या फुल फुल पंकज फुल सोडविण्याचे आश्वासन दिले.

कार्यक्रमाचे संचालन डॉ. विना पंचभाई यांनी तर आभार प्रदर्शन डॉ.शरद ठाकूर सचिव,'निमा'नागपूर यांनी केले. सदर सदर कार्यक्रमाला डॉ. शैलेंद्र अग्रवाल, डॉ. विकास चिटमुलवार, डॉ.पंकज भोयर, डॉ. शांतीदास लुंगे, डॉ.मोहन येंडे, डॉ.प्रवीण डांगोरे, डॉ. विना फाये,डॉ.पंकज थूल, डॉ. वैशाली चरडे,डॉ. विनोद गंभीर, डॉ.सुरेश खंडेलवाल,डॉ.याकूब,डॉ.राजकुमार कोसे, डॉ. शेखर तन्माने,डॉ.विवेक येवले,डॉ.आलम डॉ.राम मसूरके, डॉ.जगमोहन राठी,डॉ. अरुण फरकसे ,डॉ.अनिमेष भोयर, डॉ. दिलीप फाये,डॉ.जीवेश पंचभाई,डॉक्टर प्रशांत पुरकर यांचे सह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

धनतेरसच्या निमित्ताने पंचवटी वृद्धाश्रम, नागपूर येथे संगीतमय कार्यक्रम उत्साहात साजरा

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर : मातृसेवासंघ,पंचवटी वृध्दाश्रम,नागपूर येथे धनतेरसच्या शुभमुहूर्तावर सप्तसुर म्युझिक अकॅडमीच्या वतीने संगीतमय कार्यक्रम आयोजित करण्यात आला.या कार्यक्रमांचा आनंद वृध्दाश्रमातील संपूर्ण वृद्धांनी मोठ्या आनंदाने घेतला व त्यांच्यात



अत्यंत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.संगीताच्या माध्यमातून वृध्दांमध्ये प्रेम व आपुलकीची भावना जागृत करण्यात आली.यावेळी सप्तसूर अकॅडमीच्या कलाकारांनी भाग घेऊन आपल्या संगीतमय कार्यक्रमातून सर्वांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाला प्रामुख्याने सप्तसुर म्युझिक अकॅडमीच्या संचालिका सविता मोहळे,रमेश डफ,विनोद कावडे,डॉक्टर सुवर्णा भोयर,महेश अंजीकर,राम सिंह राठोडे,गीता काकडे, आशा नवघरे,उज्वला बोरकर,मीनल ठाकरे,दुर्गा बाबुळकर, मीना भिवापुरकर, प्रशांत बोरकर इत्यादी कलाकार उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ओमप्रकाश साहू यांनी केले.

पारधी बांधवांसोबत पंचायत समितीची दिवाळी; सामाजिक दुरावा मिटविण्याचा स्तुत्य उपक्रम

गरडापार येथे आरोग्य शिबिर; महिलांना साड्या, चिमुकल्यांना नवीन कपड्यांची भेट

दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर

समाजातील वंचित घटकांनाही सणाच्या आनंदात सहभागी करून घेत सामाजिक बांधिलकी जपण्याचा उपक्रम भिवापूर पंचायत समितीने राबविला. पंचायत समितीचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शुक्रवारी (६ नोव्हेंबर) ग्रामपंचायत पाहमी अंतर्गत येणाऱ्या गरडापार येथे पारधी बांधवांसोबत दिवाळी साजरी केली.

गटविकास अधिकारी डॉ. चेतन जाधव यांच्या संकल्पनेतून आयोजित या उपक्रमाद्वारे पारधी समाजातील नागरिकांशी संवाद साधत त्यांच्यातील सामाजिक दुरावा कमी करण्याचा प्रयत्न करण्यात आला. यावेळी महिलांना भाऊबीजेची ओवाळणी म्हणून साड्या, तर लहान मुलांना नवीन कपड्यांचे



वाटप करण्यात आले. अनपेक्षितपणे मिळालेल्या या भेटींमुळे महिला आणि चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला. दिवाळीच्या आनंदासोबतच गावकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेत आरोग्य विभागाच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिरही आयोजित करण्यात आले. या शिबिराचा गावातील नागरिकांनी लाभ घेतला.

या उपक्रमात गटविकास अधिकारी डॉ. चेतन जाधव, सहाय्यक गटविकास अधिकारी दयानेश्वर भोगे, तालुका आरोग्य अधिकारी प्रवीण राऊत, गटशिक्षणाधिकारी संतोष सोनटक्के, सहाय्यक प्रशासन अधिकारी प्रवीण भापकर, पाहमीच्या सरपंच आरती भोयर, ग्रामपंचायत अधिकारी कविता इंगळे यांच्यासह पंचायत समिती व आरोग्य विभागातील अधिकारी-कर्मचारी सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे संचालन अशोक हेडाऊ यांनी केले. सण केवळ स्वत:पुरता मर्यादित न ठेवता समाजातील वंचित घटकांसोबत आनंद वाटून घेण्याचा पंचायत समितीचा हा उपक्रम तालुक्यात कौतुकाचा विषय ठरला आहे.

दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी महावितरणचे योगदान

मुख्यमंत्री सहाय्यता निधीला ३.६८ कोटी रुपयांची मदत!

दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई

महाराष्ट्रातील गंभीर दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सामाजिक बांधिलकी जपत महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी ३ कोटी ६८ लाख १७ हजार ८८७ रुपयांची भरीव मदत केली आहे. अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला आणि मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तसेच महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी शुक्रवारी (०६ नोव्हेंबर) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबईस्थित वर्षा निवासस्थानी भेट घेऊन या मदतनिधीचा धनादेश त्यांच्याकडे सुपूर्द केला.



ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विक्रम कुमार, महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी., महावितरणचे संचालक धनंजय औंढेकर (संचालन), योगेश गडकरी (वाणिज्य), अनुदीप दिघे (वित्त), राजेंद्र पवार (मानव संसाधन) यांची वावेळी प्रमुख उपस्थिती होती. राज्यातील अनेक भागांमध्ये सध्या भीषण दुष्काळाचे सावट असून, बळीराजा आणि ग्रामीण जनता मोठ्या संकटात आहे. या संकटकाळात दुष्काळग्रस्तांना हक्काचा आधार देण्यासाठी महावितरणच्या ऊर्जेने भारलेल्या संवेदनशील कर्मचाऱ्यांनी स्वेच्छेने आपले योगदान दिले आहे. वर्ग एकच्या अधिकाऱ्यांपासून ते क्षेत्रीय स्तरावर काम करणाऱ्या चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांपर्यंत सर्वांनीच या मदतकार्यात उत्स्फूर्ततेने सहभाग नोंदवला.

धनादेश स्वीकारताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महावितरणच्या सर्व कर्मचाऱ्यांचे आणि व्यवस्थापनाचे विशेष आभार मानले. दुष्काळाच्या या कठीण काळात महावितरणने दाखवलेली ही संवेदनशीलता कौतुकास्पद आहे.

ही मदत दुष्काळग्रस्त भागातील नागरिकांना तत्काळ दिलासा देणारी अत्यंत महत्त्वाची ठरेल, अशा भावना मुख्यमंत्र्यांनी वावेळी व्यक्त केल्या. महावितरणने नेहमीच वीज पुरवठ्यासोबतच सामाजिक जबाबदारीचे भान राखले आहे. संकटाच्या काळात महावितरण राज्यासोबत ठामपणे उभी राहते, हे या मदतीतून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

पुरस्कारावद्दल कौतुकः केंद्र शासनाच्या नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय आणि पॉवर फायनान्स कॉर्पोरेशन यांच्या मूल्यांकन अहवालानुसार 'रिन्युएबल एनर्जी स्टेट असेसमेंट फ्रेमवर्क' अंतर्गत भारतामध्ये हरित ऊर्जेच्या निर्मिती आणि विकासात महाराष्ट्र राज्याला देशातील राज्यांमध्ये द्वितीय क्रमांक मिळाला आहे. या पुरस्काराबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला आणि अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्यासह महावितरणच्या कर्मचाऱ्यांचे वावेळी अभिनंदन व कौतुक केले.

थोडक्यात

श्री जगनाडे महाराज नागरी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी डॉ. योगेश पाटील तर संचालकपदी जयंत पाटील



दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

सावनेर तालुक्यातील प्रसिद्ध असलेल्या श्री जगनाडे महाराज नागरी सहकारी पतसंस्थेतील अध्यक्ष पदावरून अपात्र झालेले अशोक उमाटे यांच्या रिक्त झालेल्या संचालक तथा अध्यक्ष पदाची निवडणूक पतसंस्थेच्या कार्यालयात पार पडली या पदावर अध्यक्ष म्हणून डॉ. योगेश मदन पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली. तसेच संचालकपदी जयंत भालचंद्र पाटील यांची निवड करण्यात आली. डॉ. पाटील हे के. डी पवार महाविद्यालयात कार्यकारी प्राचार्य असून सावनेर येथे मोबाईल क्षेत्रात प्रसिद्ध व्यापारी सुद्धा आहे. पतसंस्थेमध्ये उपाध्यक्ष म्हणून सुद्धा त्यांनी कारभार बघितला होता. पतसंस्थेच्या कार्यालयात ही निवडणूक प्रक्रिया पार पडली. यावेळी पतसंस्थेचे उपाध्यक्ष गोपाल घटे, संचालक शेखर कावडकर,धर्मराज घटे,प्रकाश बालपांडे, राजेंद्र भकते, प्रकाश बागडे,सुचिता देशमुख,सारिका पिसे, व्यवस्थापक सोमेश्वर भुसारी उपस्थित होते. शहरातील प्रसिद्ध डॉ विजय घटे, डॉ अशोक घटे, राजू देशमुख, चंद्रकांत पिसे व राहुल बारई यांनी शुभेच्छा दिल्या. निवडणूक प्रक्रिया अध्यासी अधिकारी तिलक पैठे,सहकार अधिकारी मुख्य लिपिक टेकाम मॅडम, सहाय्यक सहकार अधिकारी जाधव व सहाय्यक अधिकारी वन बाभरे यांनी निवडणूक प्रक्रिया उत्कृष्टरित्या पार पडली.

अरोली येथील १५ दिवसीय योग शिबिराचा थाटात समारोप

रामटेक येथून पहाटे ५ वाजता अरोली येथे येऊन महिलांना योगाचे धडे देणाऱ्या कोदामेंढीतील प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ हर्षा आंबिलढूके यांच्या सत्कार



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा

२२ ऑक्टोंबर पासून अरोली येथे सतत पंधरा दिवस सुरू असलेला योग शिबिराचा गुरुवार (ता.५ नोव्हेंबर)ला समारोप करण्यात आला. अनेक महिलांनी या योग शिबिराचा लाभ घेतला. महिलांचं शरीर स्वस्थ व निरोगी राहण्यासाठी कोदामेंढी येथील सुप्रसिद्ध स्त्रीरोगतज्ञ डॉ. हर्षा आंबिलढूके यांनी महिलांना योग शिकविण्याकरता अतिशय परिश्रम घेऊन रोज पहाटे ५ वाजता रामटेक वरून अरोली येथे येत होत्या. त्यामुळे समारोप प्रसंगी डॉ. आंबिलढूके यांचे शाल आणि एक झाडाचे रोपटे देऊन सर्व महिलांनी सत्कार केले व मनःपूर्वक आभार मानले.

याप्रसंगी अरोली सरपंचा रोशनी प्रशांत भुरे यांनी महिलाना आवाहन केले की, डॉ. आंबिलढूकेने शिकविल्याप्रमाणे सर्व महिलांनी दररोज याच ठिकाणी किंवा आपापल्या सोयीनुसार योग्य ठिकाणी योग करावा व आपले शरीर स्वस्थ व निरोगी ठेवावे, कारण सुदृढ शरीरातच सुदृढ मनाचा निवास असतो.

जि प प्राथमिक शाळा, कोदामेंढीत पहिल्या सत्राचा समारोप दिवाळी मिलन कार्यक्रमाने



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा

जि.प. प्राथमिक शाळा कोदामेंढी येथे पहिल्या सत्राचा समारोप नुकताच दिवाळी मिलन कार्यक्रमाने संपन्न करण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले व दिवाळीच्या सुट्टया जाहीर करण्यात आल्या. याप्रसंगी भाजपा तालुका मौदा मंडळ अध्यक्ष भगवान बावनकुळे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष पंकज खडसे, उपसरपंच गोपाल गिरमेकर, उपाध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती पूजा शिदि, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य शुभांगी उत्तमवार, अमोल किटे, मुख्याध्यापक मनोज मानकर, शिक्षकवृंद रजनी काचुरे, ज्योती मालानी, संभाजी जाधव,कुमारी कदम सह शाळेतील सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

कुरियर पार्सलच्या स्फोटातील तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू

लातूर : लातूर शहरातील उद्योग भवन परिसरात असलेल्या उमाटे कुरियर कंपनीमध्ये कुरियरचे बॉक्स उतरावत असताना दि. ३१ ऑक्टोबर रोजी एका बॉक्सचा अचानक भीषण स्फोट झाला होता. या स्फोटात नागनाथ स्वामी हा युवक गंभीर जखमी झाला होता. या घटनेनंतर जखमी युवक नागनाथ स्वामीला तात्काळ एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचारादरम्यान त्याने ५ दिवस मृत्यूशी झुंज दिली. मात्र, अखेर आज त्या तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला. लातूरमधील उद्योग भवन परिसरातील उमाटे कुरिअर सर्व्हिस येथे ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी कुरिअर पार्सल उतरवताना एक भीषण स्फोट झाला होता. कुरिअरच्या वाहनातून (टेम्पो) पार्सलचे बॉक्स खाली उतरवत असताना हा स्फोट झाला. या स्फोटामुळे टेम्पोचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आणि या कुरियरचे बॉक्स उतरविणारा कर्मचारी नागनाथ स्वामी गंभीर जखमी झाला होता.

३ लाख ५ हजार शेतकऱ्यांच्या खात्यात १५२ कोटी जमा

दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना प्रत्येकी ५ हजाराची मदत

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

कमी पर्जन्यमान आणि भूगर्भातील कमी जलसाठ्यामुळे यावर्षी दुष्काळस्थिती निर्माण झाली आहे. जिल्ह्यातील सर्व तालुक्यांत दुष्काळ घोषित करण्यात आला आहे. कमी पर्जन्यमानाचा खरीप पिकांवर देखील परिणाम झाला. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी दिवाळीपूर्वी प्रत्येकी ५ हजार रुपये त्यांच्या खात्यात जमा करण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली होती. त्यानुसार आतापर्यंत ३ लाख ५ हजारावर शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम



जमा करण्यात आली आहे. एलनिनोच्या प्रभावामुळे यावर्षी पर्जन्यमान कमी झाले. त्याचा परिणाम कापुस, सोयाबिन, तुरसह अन्य पिकांवर झाला. बहुतांश भागात शेतकऱ्यांना उत्पन्नात घट आली. पुढे रब्बी आणि उन्हाळी पिकांवर देखील विपरीत परिणाम होणार आहे. अशा स्थितीत शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने दुष्काळी परिस्थिती जाहीर करून उपाययोजना सुरु केल्या आहे. त्यात विविध दिलासादायक बाबींचा समावेश आहे.

दुष्काळीस्थितीमुळे हवालदील शेतकऱ्यांना तातडीचा दिलासा देण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात प्रत्येकी ५ हजार रुपये जमा करण्याची घोषणा केली होती. जिल्ह्यात दिनांक २ नोव्हेंबर पासून शेतकऱ्यांच्या आधारलिंक खात्यात रक्कम जमा केली जात आहे. तालुका व जिल्हास्तरावर खाती स्विकृत करण्यात आलेल्या आतापर्यंत ३ लाख ५ हजार २७४ खात्यांमध्ये प्रत्येकी ५ हजार याप्रमाणे १५२ कोटी ६३ लाख ७० हजार रुपये जमा करण्यात आले आहे.

आतापर्यंत रक्कम जमा करण्यात आलेल्या शेतकऱ्यांची तालुकानिहाय संख्या पुढील प्रमाणे आहे. नागपूर ग्रामीण तालुका ५६२५ शेतकरी २,८१,२५,०००, हिंगणा तालुका ७७२८ शेतकरी ३,८६,४०,०००, कामठी तालुका १४,६२६ शेतकरी ७,३१,३०,०००, मौदा तालुका ५१,७१५ शेतकरी २५,८५,७५,०००, सावनेर तालुका ३४,७०४ शेतकरी १७,३५,२०,०००, कळमेश्वर तालुका २९,२१३ शेतकरी १४,६०,६५,०००, रामटेक तालुका २३,१२६ शेतकरी ११,५६,३०,०००, पारशिवणी तालुक्यातील २४,९२१ शेतकऱ्यांच्या खात्यात १२,४६,०५,००० इतकी रक्कम जमा करण्यात आली आहे.

काटोल तालुक्यातील १९,१८१ शेतकऱ्यांच्या खात्यात ९,५९,०५,०००, नरखेड तालुका ३३,३१९ शेतकरी १६,६५,९५,०००, उमरेड तालुका १६,५७५ शेतकरी ८,२८,७५,०००, कुही तालुका २२,७९२ शेतकरी ११,३९,६०,००० तर भिवापूर तालुक्यातील २१,७४९ शेतकऱ्यांच्या खात्यात १०,८७,४५,००० इतकी याप्रमाणे एकून ३ लाख ५ हजार २७४ शेतकऱ्यांच्या खात्यात १५२ कोटी ६३ लाख ७० हजार रुपये जमा करण्यात आले आहे. अद्याप खाते स्विकृती व रक्कम जमा करण्याची प्रक्रिया सुरुच आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा संख्येत वाढ होणार आहे.

विलास कारखान्याकडून शेतकऱ्यांची दिवाळी गोड

लातूर : सहकार आणि साखर उद्योगातून सभासद, ऊसउत्पादक व कामगारांच्या हित जोपासणारे विलास सहकारी साखर कारखाना लि., वैशालीनगर, निवळी आणि विलास सहकारी साखर कारखाना लि., तोंडार, उदगीर या दोन्ही कारखान्यांच्यावतीने गाळप झालेल्या ऊस उत्पादकांच्या ऊसाला दीपावली सणापूर्वीच पहिला हप्ता प्रति टन ३ हजार प्रमाणे खात्यात जमा करण्यात आला आहे. मांजरा परिवारातील साखर कारखाने यंदाच्या गाळप हंगामात उसाला प्रति टन तीन हजार रुपये पहिली उचल देणार असल्याची घोषणा सहकार महर्षी, माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी केली होती. गळीत हंगाम शुभारंभ प्रसंगी माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी या घोषणेला बांधील राहून मराठवाडयात सर्वाधिक ऊसदर दिला जाईल असे सांगीतले होते. विलास सहकारी साखर कारखाना लि., वैशालीनगर, निवळीच्या वतीने दीपावलीपूर्वी बँक खात्यात पहिला हप्ता म्हणून १६ कोटी ८ लाख ९३ हजार रुपये (प्रति मेट्रिक टन ३,०००/- प्रमाणे) जमा करण्यात आले आहेत. या कारखान्याचे आज अखेर गाळप दिवस १४ झाले असून, यादरम्यान ७३ हजार ९७० मे.टन ऊसाचे गाळप झाले आहे. या गाळपातून आज अखेर ६१ हजार ६६० साखर पोती (क्विंटल) उत्पादित झाली असून कारखान्याचा आजअखेर साखर उतारा ८.५० टक्के इतका राहिला आहे. तसेच, विलास सहकारी साखर कारखाना लि., तोंडार, उदगीरच्या वतीने दीपावलीपूर्वी बँक खात्यात पहिला हप्ता म्हणून १७ कोटी ३० लाख रुपये (प्रति मेट्रिक टन ३,०००/- प्रमाणे) जमा करण्यात आले आहेत.

श्रमदानातून जलसंधारणाचा प्रेरणादायी उपक्रम; रोंढा गावात महिलांनी उचलला बंधारा बांधणीचा विडा!

'पाणी अडवा, पाणी जिरवा'चा संदेश देत प्रगतशील महिला शेतकरी गटाचा पुढाकार, पाणी फाउंडेशनचेही श्रमदान



दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा

भविष्यातील पाणीटंचाईवर मात करून गावाची जलपातळी वाढविण्याच्या उद्देशाने सालेकसा तालुक्यातील रोंढा येथे श्रमदानातून जलसंधारणाची लोकचळवळ उभी राहत आहे. गावातील स्मशानभूमीजवळील नाल्यावर बंधारा बांधण्याचा महत्त्वपूर्ण उपक्रम प्रगतशील महिला शेतकरी गट, रोंढा यांच्या पुढाकारातून सुरू करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, या उपक्रमात महिलांनी केवळ पुढाकारच घेतला नाही, तर स्वतः श्रमदानासाठी मैदानात उतरून समाजासमोर एक आदर्श निर्माण केला आहे. काल दिवसभर महिलांनी उत्स्फूर्तपणे श्रमदान करीत बंधाऱ्याचा पाया तयार करण्याचे काम केले. या उपक्रमात पाणी फाउंडेशनच्या टीमनेही सहभागी होत श्रमदान केले.

सदर बंधाऱ्याचे काम मोठ्या स्वरूपाचे असून, त्यासाठी माती खोदणे, माती वाहून आणणे, पोत्यांमध्ये माती भरणे तसेच पोती रचून बंधाऱ्याची उभारणी करणे अशी विविध कामे करावी लागणार आहेत. त्यामुळे हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी संपूर्ण गावाचा सहभाग आणि लोकसहभागातून एकजूट होणे अत्यंत आवश्यक आहे. याच पार्श्वभूमीवर रोंढा येथील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, प्रतिष्ठित नागरिक, महिला व पुरुष शेतकरी, महिला बचत गट, युवक-युवती, जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक व विद्यार्थी, कृषी विभागाचे अधिकारी-कर्मचारी, पंचायत समिती व तहसील प्रशासनातील अधिकारी-कर्मचारी तसेच उमेद अभियानाचे अधिकारी-कर्मचारी आणि सर्व ग्रामस्थांनी या उपक्रमात सहभागी होऊन आपल्या परीने श्रमदान करावे, असे मनापासून आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. आज दिलेले काही तासांचे श्रमदान भविष्यात हजारो लिटर पाणी अडविण्यास आणि जमिनीत मुरविण्यास मदत करू शकते. यामुळे भूजलपातळीत वाढ होण्यासोबतच परिसरातील शेतीला आणि आगामी पिढ्यांना मोठा लाभ मिळू शकतो. पाण्याचे महत्त्व ओळखून प्रत्येक ग्रामस्थाने या कार्यात आपला सहभाग नोंदविण्याची गरज आहे. 'एकीचे बळ आणि श्रमदानाची साथ, रोंढा गावाची जलसमृद्धीकडे वाटचाल' हा संदेश देत गावकऱ्यांनी एकत्र येऊन हा बंधारा पूर्ण करावा आणि जलसंधारणाच्या क्षेत्रात रोंढा गावाने एक आदर्श निर्माण करावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

माणुसकीचा अखेरचा निरोप.. निराधार शांताबाईच्या पार्थिवाला हितेश बनसोड यांच्या पुढाकारातून सन्मानाचा अखेरचा निरोप

दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

मृत्यूनंतरही माणुसकी जिवंत असते, याचा प्रत्यय सावनेर येथे पुन्हा एकदा आला. आयुष्यभर संघर्ष करत एकट्याने जीवन जगणाऱ्या शांताबाई हिरालाल कैथवास (वय ५०, रा. हज्ज रामनगर, सावनेर) यांच्यावर अखेरच्या क्षणी अंत्यसंस्कार करण्यासाठीही कोणी नातेवाईक पुढे नसल्याने गावकऱ्यांवर ही जबाबदारी आली. मात्र, अशा कठीण प्रसंगी सामाजिक कार्यकर्ते तथा हितज्योती आधार फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष हितेश बनसोड यांनी माणुसकीचे नाते जपत पुढाकार घेतला आणि शांताबाईना सन्मानपूर्वक अखेरचा निरोप दिला.

मिळालेल्या माहितीनुसार, शांताबाई गेल्या महिनाभरापासून नागपूर येथील मेडिकल हॉस्पिटलमध्ये उपचार घेत होत्या. उपचारादरम्यान दिनांक ५ नोव्हेंबर २०२६ रोजी त्यांची प्राणज्योत मालवली. शांताबाईच्या पतीचे २०२२ मध्येच निधन झाले होते.



तेव्हापासून त्या रामनगर परिसरातील एका झोपडीत एकट्याच राहत होत्या. मिळेल ते काम करून स्वतःचा उदरनिर्वाह त्या करत होत्या. मात्र, मृत्यूनंतर त्यांच्या मागे-पुढे कोणीही नसल्याने त्यांच्या अंत्यसंस्काराचा प्रश्न निर्माण झाला.

या परिस्थितीची माहिती पटकखेडीचे सरपंच दिगंबर वानखेडे आणि पोलीस पाटील बाबा प्रधान यांनी सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांना दिली. माहिती मिळताच हितेश बनसोड यांनी क्षणाचाही विलंब न करता अंत्यसंस्काराची जबाबदारी स्वीकारली. आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून शांताबाईचे पार्थिव हितेश बनसोड यांच्या अँम्बुलन्समधून सावनेर येथील राम गणेश गडकरी स्मशानभूमीत आणण्यात आले. तेथे विधिवत अंत्यसंस्कार करण्यात आले.

या अंत्यसंस्कारातील सर्वात भावनिक क्षण म्हणजे हितेश बनसोड यांचे पुत्र प्रहार हितेश बनसोड यांनी शांताबाईंना मुखाग्नी दिला. रक्ताचे नाते नसतानाही एका निराधार आजीला नातवाप्रमाणे अखेरचा निरोप देण्याचा हा प्रसंग उपस्थितांच्या डोळ्यांत अश्रू आणणारा ठरला.

यावेळी विशाल जेसवानी (हिंगणघाट), दिगंबर वानखेडे (सरपंच, पटकखेडी), पोलीस पाटील बाबा प्रधान, राजू घुगल, अतुल लांबट तसेच हितज्योती आधार फाउंडेशनचे टीम मेंबर आकाश यादव, राजेश सिदेवार, नरेंद्र समदूरकर, चंदू मिस्त्री अभिषेक भगत आणि तालुका मराठी पत्रकार संघाचे किशोर ढुंढेले उपस्थित होते.

रक्ताच्या नात्यापेक्षा माणुसकीचे नाते मोठे..

आजच्या काळात जिथे अनेकदा माणसे आपल्या जवळच्या व्यक्तींचीही जबाबदारी टाळताना दिसतात, तिथे हितेश बनसोड यांनी एका अनोळखी निराधार महिलेच्या अंतिम प्रवासाची जबाबदारी स्वीकारून समाजासमोर माणुसकीचा आदर्श ठेवला आहे. शांताबाईंना आयुष्यभर एकटेपणाचा सामना करावा लागला, मात्र मृत्यूनंतर त्यांना सन्मानाने अखेरचा निरोप मिळाला. माणुसकीचा हा प्रसंग सावनेर परिसरात चर्चेचा विषय ठरला आहे.

हितज्योती आधार फाउंडेशनचा संदेश

जिवंतपणी आधार आणि मृत्यूनंतर सन्मानाचा निरोप, हाच आमच्या सामाजिक कार्याचा खरा उद्देश आहे.

भावभक्ती गीतांसह नृत्याविष्काराने रंगली 'मंगल दीप संध्या'

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

दिवाळीच्या मंगलमय पर्वानिमित्त संत ज्ञानेश्वर मंदिर आणि बजाजनगर नागरिक कृती समितीच्या वतीने आयोजित 'मंगल दीप संध्या' हा सांगीतिक कार्यक्रम भाव, भक्तिरस, सुरेल संगीत आणि बहारदार नृत्याविष्काराने रंगला. बजाजनगर येथील एनबीवायएस बास्केटबॉल मैदानावर सृजन ऑडिओज प्रस्तुत या कार्यक्रमात महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेसह मराठी आणि हिंदी भावभक्ती गीतांचा सुरेल संगम रसिकांना अनुभवायला मिळाला.

कार्यक्रमाची संकल्पना प्रसिद्ध गायक अमर कुलकर्णी यांची होती. अमर कुलकर्णी आणि डॉ. मंजिरी वैद्य अय्यर यांनी आपल्या सुमधुर गायनाने रसिकांची मने जिंकली. त्यांना



सहगायक सचिन कोल्हारकर, वेदांत दांडेकर, वरुण व्यवहारे, नुपूर देशपांडे, अदिती कोल्हारकर आणि श्रद्धा तिडोळे यांनी साथ दिली. दीपप्रज्वलन आणि भारतमाता पूजनाने कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. जयोस्तुते या समूहगीताने सांगीतिक मैफलीला सुरुवात झाली. रुणुझुणु रुणुझुणु रे भ्रमरा, दिंडी, विठूचा गजर, माऊली माऊली आणि हम करे राष्ट्र आराधना या गीतांनी वातावरण भक्तिमय केले. याशिवाय म्हाऱा रे वो, घूमर, मोती वेराणा, पिया तोसे नैना लागे रे, मधुबन में राधिका, होठों में ऐसी बात, एक चतुर नार, छबीदार छबी, वाजले की बारा, मी हाय कोळी, वेसावची पारू, आई भवानी आणि लल्लाटी भंडार यांसारख्या लोकप्रिय गीतांच्या सादरीकरणाला रसिकांनी उत्स्फूर्त दाद दिली.

घनश्याम सुंदरा, वासुदेव, मोरया मोरया आणि घालीन लोटांगण या गीतांवर सादर झालेल्या नृत्याविष्काराने कार्यक्रमात विशेष रंगत आणली. भक्तिगीते, भावगीते, लावणी, लोकगीते आणि देशभक्तिपर गीतांच्या वैविध्यपूर्ण सादरीकरणामुळे संपूर्ण मैफल बहुरंगी झाली.

संगीत, भक्ती आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देणाऱ्या मिले सुर मेरा तुम्हारा या गीताने कार्यक्रमाची भावपूर्ण सांगता झाली. मृण्मयी कुलकर्णी आणि चैतन्य देशपांडे यांनी प्रभावी निवेदनातून कार्यक्रमाची रंगत कायम ठेवली. आनंद मास्टे यांनी संगीत संयोजनाची जबाबदारी सांभाळली. ध्वनी संयोजन अभिषेक लिल्होरे, प्रकाशयोजना मॉंटी सोनुने आणि नेपथ्य राजेश अमिन यांनी सांभाळले.

युवा क्रिकेटपटू हर्ष दुबे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी त्यांचा सत्कार करण्यात आला. ज्ञानरंग ज्ञानेश्वरी ॲपचे निमार्ते श्रीनिवास वर्णेकर आणि निवेदिका रेणुका देशकर यांचाही सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या आयोजनात योगदान देणाऱ्या सेवादूतांचाही यावेळी सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला संत ज्ञानेश्वर मंदिर समितीचे अध्यक्ष अशोक गुजरकर, उपाध्यक्ष राजेंद्र धाबे, अविनाश संगवई, प्रफुल्ल क्षीरसागर, संध्या अय्यर, उमेश अनिखिंडी, संयोजक यश वर्मा, अनिल नायर, प्रत्युष कुळकर्णी, ऋषभ वर्मा, अरुण डोंगरे आणि विजय वर्गीय उपस्थित होते.

थोडक्यात

युद्धपातळीवर काम अन् तत्परता : कोदगावातील कृषिपंपांचा वीजपुरवठा महावितरणकडून अवघ्या काही तासांत पूर्ववत!

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

बळिराजाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहत महावितरणच्या सावनेर उपविभागाने पुन्हा एकदा आपल्या गतिमान कार्यपद्धतीचा आणि उच्च ग्राहकसेवेचा प्रत्यय दिला आहे. सावनेर तालुक्यातील कोदगाव परिसरातील कृषिपंपांना वीजपुरवठा करणाऱ्या मुख्य वीजवाहिनीचा कंडक्टर ३ नोव्हेंबर २०२६ च्या मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी लांबवल्यामुळे संपूर्ण परिसरातील सिंचन व्यवस्था ठप्प झाली होती. मात्र, घटनेचे गांभीर्य ओळखून महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दाखवलेल्या तातडीच्या तत्परतेमुळे अवघ्या काही तासांत सर्व कृषिपंपांचा वीजपुरवठा यशस्वीरीत्या पूर्ववत करण्यात यश आले आहे. कोदगाव परिसरातील शेतीसाठी महत्त्वाच्या असलेल्या या वीजवाहिनीचे सुमारे सहा स्पॅन कंडक्टर चोरट्यांनी चोरून नेले. या चोरीमुळे वीजपुरवठा अचानक खंडित झाल्याने आणि वाहिनीचे खांबही वाकल्याने शेतकऱ्यांसमोर पिकांना पाणी देण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. ऐन सिंचनाच्या मोसमात घडलेल्या या घटनेमुळे परिसरातील शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण पसरले होते.



घटनेची माहिती मिळताच महावितरणच्या सावनेर उपविभागाने त्वरित हालचाली करत ४ नोव्हेंबर २०२६ रोजी संबंधित पोलीस ठाण्यात अधिकृत तक्रार नोंदवली. त्यानंतर बाधित शेतकऱ्यांच्या एका शिष्टमंडळाने उपविभागीय कार्यालयाला भेट देऊन वीजपुरवठा लवकरात लवकर सुरळीत करण्याची आग्रही मागणी केली. यावेळी महावितरणच्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांचे म्हणणे अत्यंत संवेदनशीलतेने ऐकून घेत, आजच्या आजच सर्व दुरुस्ती पूर्ण करून वीजपुरवठा बहाल करण्याचे ठाम आश्वासन दिले. दिलेल्या शब्दाला जागत महावितरणचे उपविभागीय अधिकारी, अभियंता आणि तांत्रिक कर्मचाऱ्यांचे पथक आज भल्या पहाटेपासूनच प्रत्यक्ष घटनास्थळी दाखल झाले. कर्मचाऱ्यांनी कोणतीही दिरंगाई न करता युद्धपातळीवर कामाला सुरुवात केली. चोरीस गेलेल्या सहा स्पॅन कंडक्टरची नवी वाहिनी टाकून पुनर्रचना करण्यात आली, तसेच वाकलेल्या व क्षतिग्रस्त झालेल्या विद्युत खांबांचे मजबूतीकरण करण्याचे आव्हानात्मक काम पूर्ण केले.

शेतकऱ्यांकडून महावितरणचे कौतुक

अहोरात्र मेहनत आणि सुयोग्य नियोजनाच्या बळावर आज सायंकाळपर्यंत संपूर्ण दुरुस्ती पूर्ण करण्यात आली आणि कोदगाव परिसरातील कृषिपंपांचा वीजपुरवठा सुरळीत झाला. महावितरणने दिलेल्या मुदतीत काम पूर्ण करून शेतीचा संभाव्य धोका टाळल्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे. महावितरणच्या या तत्पर, कर्तव्यदक्ष आणि सकारात्मक कामगिरीबद्दल शेतकरी वर्गातून समाधान व्यक्त होत असून सर्वत्र कौतुक केले जात आहे.

पाचगावच्या जिल्हा परिषद शाळेत स्तन कर्करोग जनजागृती

डीटीसी फाऊंडेशनचा स्तुत्य उपक्रम, विद्यार्थिनींशी थेट संवाद साधून दिले आरोग्यविषयक मार्गदर्शन



दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड

महिलांमध्ये वाढत असलेल्या स्तन कर्करोगाबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने डीटीसी फाऊंडेशनच्या वतीने पाचगाव येथील जिल्हा परिषद शाळेत स्तन कर्करोग जनजागृती मोहीम राबविण्यात आली. राष्ट्रीय कर्करोग जनजागृती दिनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या उपक्रमातून विद्यार्थिनींना आजाराची प्राथमिक लक्षणे, संभाव्य कारणे, वेळेवर तपासणी आणि आवश्यक आरोग्यविषयक खबरदारी याबाबत माहिती देण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावप्रमुख चेतन फाटिंग होते. यावेळी डीटीसी फाऊंडेशनचे स्वयंसेवक डिंपल नारनवरे, संचिता सोमकुवर, आशिष वासनिक व यश सोमकुवर, तसेच शाळेचे मुख्याध्यापक गजानन मोटघरे, शिक्षिका सविता धवले, प्रभा शिरपुरे व वर्षा रंदारी उपस्थित होते.

फाऊंडेशनच्या सचिव आकांक्षा सोमकुवर यांनी विद्यार्थिनींना स्तन कर्करोगाविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. विशेष म्हणजे विद्यार्थिनींनी आजारासंदर्भातील विविध प्रश्न मोकळेपणाने विचारले. त्यांच्या प्रश्नांना सोप्या भाषेत उत्तरे देत योग्य आरोग्यविषयक माहिती देण्यात आली. 'वेळेवर जागरूकता, अचूक माहिती आणि वेळेवर वैद्यकीय तपासणी ही कर्करोगाविरुद्धच्या लढाईची प्रभावी सुरुवात आहे,' असा संदेश यावेळी देण्यात आला. डीटीसी फाऊंडेशनचे अध्यक्ष आकाश मेश्राम यांनी भविष्यात ही जनजागृती मोहीम अधिक जिल्हा परिषद शाळा, महाविद्यालये तसेच ग्रामीण भागात व्यापक स्वरूपात राबविण्याचा मानस व्यक्त केला. समाजातील प्रत्येक घटकापर्यंत आरोग्यविषयक अचूक माहिती पोहोचविणे हे फाऊंडेशनचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले. शालेय स्तरावर विद्यार्थिनींमध्ये आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करणारा डीटीसी फाऊंडेशनचा हा उपक्रम कौतुकास्पद ठरला.

रामायणचा पहिल्याच दिवशी ६५ कोटींचा गल्ला

मुंबई : रणबीर कपूर अभिनित रामायण चित्रपटाने पहिल्याच दिवशी ६४.८५ कोटी रुपयांची निव्वळ कमाई केली आहे. सॅकनिल्कच्या आकडेवारीनुसार, ही २०२६ मधील दुसरी सर्वात मोठी हिंदी ओपनिंग ठरली आहे. चित्रपटाने सर्व भाषांमधून मिळून ७७.५० कोटींची एकूण कमाई केली आहे. मात्र, हा चित्रपट प्रभासच्या आदिपुरुषपेक्षा मागे राहिला. आदिपुरुषने पहिल्या दिवशी ८६.७५ कोटी रुपये कमावले होते. रामायण चित्रपट देशभरात २५,२०० शोमध्ये प्रदर्शित करण्यात आला होता, ज्यामध्ये हिंदी भाषेचा सर्वात मोठा वाटा राहिला. हिंदी आवृत्तीने २०,६७८ शोच्या माध्यमातून ४७.५० कोटी रुपयांची निव्वळ कमाई केली.

संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी आशीर्वाद 'ऑन फील्ड'

शहरी व ग्रामीण भागातील पाणीपुरवठा योजनांना भेटी व पाहणी, बोरगाव बुजुर्ग व चाकडोह येथे आढावा, कळमेश्वर व ब्राह्मणी नगरपरिषद, काटोल येथील गंगालडोह व ताराबोडी येथे भेट

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील पाणीपुरवठ्याची व्यवस्था अधिक सक्षम होण्यासह संभाव्य दुष्काळी परिस्थितीत नागरिकांना दिलासा मिळावा यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आज जिल्ह्यातील नगरपरिषद व ग्रामपंचायतींना भेटी देत तेथील पाणी पुरवठा, संभाव्य टंचाई व इतर समस्यांची माहिती घेतली. उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व संबंधित यंत्रणांना पाणीपुरवठ्याबाबत येणाऱ्या समस्या प्राधान्याने सोडवण्याबाबत निर्देश दिले.

कळमेश्वर येथील बोरगाव बुजुर्ग व ग्रामपंचायत क्षेत्रातील पाणीपुरवठ्याचा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आढावा घेतला. सुमारे १२०० लोकसंख्या असलेल्या या गावाच्या परिसरात कोळशांच्या खाणी असल्यामुळे येथे पाणीटंचाईची तीव्रता अधिक असल्याचे गावकऱ्यांनी



सांगितले. येथील गावे आणि वस्त्यांवर पाण्याचा नियमित व पुरेसा पुरवठा करण्याबाबत तात्काळ उपाययोजना करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. येथील अनेक ठिकाणी पाइपलाइन टाकण्यात आली असली तरीही अनेक भागात पाण्याची कमतरता भासत असून पाणीपुरवठ्याच्या योजनांच्या अंमलबजावणी बाबत आशीर्वाद यांनी संबंधितांना निर्देश दिले. बोरगाव बुजुर्ग ग्रामपंचायतचे सरपंच श्रीराम धोटे, उपसरपंच निखिल धोटे व उपविभागीय अधिकारी कल्याणकुमार डहाट यावेळी उपस्थित होते.

चाकडोह परिसरातील पाणी पुरवठा योजनांच्या सुधारणेवर भर

चाकडोह ग्रामपंचायतीत येथे तीन टोले असून येथील एकूण लोकसंख्या सुमारे चारशे असून येथील नागरिकांना सुरळीत पाणी पुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी चाकडोह गावासह परिसरातील विविध गावांमध्ये सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनांचा आणि त्यांच्या सद्यस्थितीचा सखोल आढावा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला.

बैठकीदरम्यान चाकडोह गावातील पाणीपुरवठ्याशी संबंधित तांत्रिक अडचणी श्री आशीर्वाद यांनी जाणून घेतल्या. सध्या या भागात पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरींची स्थिती, जलकुंभांची त्यांनी माहिती घेतली. पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी नवीन कूपनलिका खोदणे, अस्तित्वात असलेल्या विहिरींची दुरुस्ती करणे आणि सौरऊर्जेचा वापर करून वीज पुरवठ्याचा प्रश्न सोडवण्याबाबत त्यांनी निर्देश दिले. ग्रामीण भागात पाण्याची टंचाई जाणवू नये आणि नागरिकांची गैरसोय होऊ नये, यासाठी प्रशासनाने तातडीने योग्य ती पावले उचलून प्रभावी उपाययोजना करण्याचे निर्देश दिले.

गंगालडोह तेथील विहिरींसाठी प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना

काटोल पंचायत समिती अंतर्गत गट ग्रामपंचायत गंगालडोह येथील पाणीपुरवठ्याची माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी घेतली. साडेतीनशे लोकसंख्या असलेल्या या गावात पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीची पाण्याची पातळी खालावली असून डिसेंबरनंतर येथे पाणीटंचाईची शक्यता निर्माण होऊ शकते. या परिसरात जमिनीतील पाणी पातळी आठशे ते नऊशे फुट खोल असून सद्य परिस्थितीत गावातील जलस्त्रोत आटले आहेत. येथील नवीन विहिरींचा आराखडा व प्रस्ताव तातडीने तयार करण्यात यावा तसेच उपविभागीय अधिकाऱ्यांनी आवश्यक त्या मंजूरी घेऊन तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. जलजीवन मिशन अंतर्गत प्रलंबित राहिलेली कामे पूर्ण करण्याचा सूचनाही त्यांनी दिल्या.

कळमेश्वर-ब्राह्मणी

नगरपंचायत क्षेत्रासाठी ४७ विहिरींचा प्रस्ताव सादर करण्यात आला असून त्यापैकी प्राधान्याने २५ विहिरींची कामे पूर्ण करण्यात यावी व उर्वरित कामे जानेवारीमध्ये हाती घेण्यात यावी, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी केल्या. ताराबोडी व महादुला येथील पाणीपुरवठ्याबाबत आशीर्वाद यांनी माहिती घेतली. येथील नागरिकांना नियमित पाणीपुरवठा करण्याबाबत येणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी तात्काळ व दीर्घकालीन उपाययोजना करण्याचे निर्देश त्यांनी संबंधितांना दिले.

भुमिगत वाहिन्यांतील बिघाड शोधणारी अत्याधुनिक 'केबल फॉल्ट डिटेक्शन व्हॅन' महावितरणच्या ताफ्यात दाखल

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नागपूर परिमंडलातील भूमिगत वीज वाहिन्यांमधील बिघाड शोधण्याचे काम अधिक पारदर्शक, अचूक आणि वेगवान करण्यासाठी महावितरणच्या ताफ्यात अत्याधुनिक 'केबल फॉल्ट डिटेक्शन व्हॅन' समाविष्ट करण्यात आली आहे. या नवीन वाहनाचे लोकार्पण नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता राजेश नाईक यांच्या हस्ते गुरुवारी (दि.५) करण्यात आले.

हे वाहन म्हणजे जमिनीखालून गेलेल्या भूमिगत वीज वाहिन्यांमधील दोष शोधणारी एक फिरती अत्याधुनिक प्रयोगशाळा आहे. परिमंडलाच्या विविध भागांत सौंदर्यीकरण आणि सुरक्षेच्या दृष्टीने भूमिगत वीज वाहिन्यांचे जाळे वेगाने विस्तारत असून, या वाहिन्यांमधील बिघाड शोधून दुरुस्त करण्याचे मोठे आव्हान महावितरणच्या कर्मचाऱ्यांसमोर असते. या तांत्रिक आव्हानावर



मात करण्यासाठी ही नवीन व्हॅन अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

सध्या सर्वत्र सुरू असलेल्या विविध विकासकामांच्या खोदकामामुळे किंवा नैसर्गिक कारणांमुळे भूमिगत केबल्समध्ये बिघाड झाल्यास संपूर्ण रस्ता, रस्ता दुभाजक किंवा पदपथ खणणे अशक्य आणि त्रासदायक ठरते. अशावेळी या चाचणी वाहनातील आधुनिक डिजिटल प्रणालीचा वापर करून जमिनीखालील बिघाडाचे नेमके ठिकाण काही मिनिटांतच शोधून काढले जाते. यामुळे तासनतास किंवा दिवसभर बिघाड शोधण्यात जाणारा वेळ वाचणार असून कमीत कमी खोदकामात दुरुस्तीचे काम पूर्ण करता येईल. परिणामी ग्राहकांचा खंडित झालेला वीजपुरवठा तातडीने पूर्ववत करणे शक्य होणार आहे. उन्हाळ्यातील वाढत्या विजेच्या मागणीमुळे येणारा ताण आणि पावसाळ्यातील दिवसांत निर्माण होणाऱ्या शॉर्ट सर्किटच्या आपत्कालीन घटनांच्या वेळी ही व्हॅन वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल.

याशिवाय, एकाच डक्टमध्ये अनेक केबल्स एकत्र असताना त्यातून नेमकी कोणती केबल खराब झाली आहे, हे अचूकपणे ओळखणे या वाहनातील उपकरणांमुळे शक्य होणार आहे. या नवीन वाहनाच्या समावेशामुळे नागपूर परिमंडलात 'केबल फॉल्ट डिटेक्शन व्हॅन'ची संख्या दोन झाली अहे.

या लोकार्पण सोहळ्याला चाचणी प्रविभागाचे अधीक्षक अभियंता वैभव पाथोडे, नागपूर शहर मंडळाचे अधीक्षक अभियंता प्रफुल लांडे, नागपूर ग्रामीण मंडळाचे अधीक्षक अभियंता संजय वाकडे, पायाभूत आराखडा विभागाच्या अधीक्षक अभियंता दीपाली माडेलवार, नागपूर शहर चाचणी विभागाचे कार्यकारी अभियंता चंदन तल्लारवार, ग्रामीण चाचणी विभागाचे कार्यकारी अभियंता नरेंद्र धवड, सिव्हिल लाईन्स विभागाचे कार्यकारी अभियंता धम्मदीप फुलझेले, काँग्रेसनगर विभागाचे कार्यकारी अभियंता राहुल जीवतोडे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता जीवने आणि उपमुख्य जनसंपर्क अधिकारी योगेश खिटनकर यांच्यासह अभियंते, तंत्रज्ञ आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कर्जवसुलीच्या तगाद्यावरून आत्महत्या

कर्ज वसुलीसाठी पत्नीला शिवीगाळ, अवमान सहन न झाल्याने टोकाचे पाऊल, लातूर शहरातील घटनेने खळबळ

लातूर : केवळ ४० हजारांच्या कर्जासाठी सतत तकादा लावून छळणाऱ्या एका सावकाराने थेट घराच्या दरवाजात जाऊन आजूबाजूच्या लोकांसमोर पत्नीला अश्लील भाषेत शिवीगाळ करून अपमानित केले. या अवमानाचा धक्का सहन न झाल्याने शहरातील अवंतीनगर भागात राहणाऱ्या ५० वर्षीय सौदागर कदम या इसमाने भाड्याच्या राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली. या प्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून, कर्जवसुलीसाठी तगादा लावून छळ करणाऱ्या शहानवाज पठाणला अटक केली. आरोपी शहानवाज पठाण (३१) याच्याकडून मयत सौदागर कदम यांनी ४० हजारांचे कर्ज घेतले होते. मात्र, काही कारणास्तव सौदागर कदम यांना कजार्ची परतफेड करता येत नव्हती. त्यामुळे आरोपी शहानवाज याने तगादा लावत चार-चौघात शिवीगाळ केल्याची घटना मयत सौदागर यांना सहन झाली नाही. त्यामुळे सौदागर कदम यांनी गळफास लावून आत्महत्या केली. या प्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद होताच पोलिसांनी आरोपी शहानवाज पठाण याला अटक करून न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने आरोपी पठाण यास एक दिवसाची पोलिस कोठडी सुनावली. एकीकडे बँका किंवा खाजगी सावकार, फायनान्सनी दुष्काळात कर्जवसुलीचा तगादा लावू नये, असे राज्य सरकार सातत्याने सांगत आहे. मात्र, प्रत्यक्षात दुष्काळी भागांत सातत्याने खाजगी फायनान्स, सावकार तगादा लावत आहेत.

मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष आता तालुकास्तरावरही

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा महत्वपूर्ण निर्णय

दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई

राज्यात दुष्काळी परिस्थितीत नागरिकांना मदतीचा हात देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष आता तालुकास्तरावरही स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. विशेष म्हणजे या कक्षात स्वतंत्रपणे वैद्यकीय अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात येणार आहे. त्यामुळे दुष्काळग्रस्त तालुक्यातील नागरिकांसाठी आरोग्यविषयक सेवा प्रभावीपणे राबविता येणार आहेत.

दुष्काळग्रस्त भागातील गरजू रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत, यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाची यंत्रणा आता थेट तालुका स्तरापर्यंत नेण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. सामान्य प्रशासन विभागाने ६ नोव्हेंबर २०२६ रोजी याबाबत शासन निर्णय जारी केला. यासोबत जिल्हा व तालुकास्तरावर आरोग्यविषयक समन्वय समित्याही स्थापन होणार आहेत. हा तालुकास्तरावरील कक्ष केवळ खरीप हंगाम २०२६ मध्ये ट्रिगर-१ मधील दुष्काळ जाहीर करण्यात आलेल्या सर्व तालुक्यांत स्थापन करण्यात येणार आहे. या तालुक्यांतील नागरिकांच्या आरोग्यविषयक गरजा लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे.

संबंधित तालुक्यातील पंचायत समिती कार्यालयात हा कक्ष सुरू होईल. जिल्हाधिकारी या कक्षात एका स्वतंत्र वैद्यकीय अधिकाऱ्याची कक्ष प्रमुख म्हणून नियुक्ती करतील. त्यांच्या मदतीला लिपिक व टंकलेखक असतील, तर आवश्यक सुविधा गटविकास अधिकाऱ्यांनी प्राधान्याने पुरवावयचा आहेत.

आधी शासकीय योजना, मग निधीतून मदत

रुग्णांना पात्रतेनुसार आधी आयुष्मान भारत, महात्मा फुले जन आरोग्य योजना, कामगार विभागाच्या योजना व धमार्दाय



रुग्णालयांतून उपचार मिळवून दिले जातील. या योजनांसाठी अपात्र ठरणाऱ्या रुग्णांचे अर्ज संलग्न रुग्णालयांमार्फत ऑनलाइन प्रणालीवर मंजुरीसाठी पाठवले जातील. त्यासाठी कक्ष मार्गदर्शन करेल. कक्ष प्रमुखांनी उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे आणि आशा सेविकांमार्फत गरजू रुग्णांचा शोध घ्यायचा असून, कोणताही रुग्ण उपचारांपासून वंचित राहणार नाही याची जबाबदारी या कक्षावर असेल.

दोन स्तरांवर समित्या

तालुकास्तरीय समितीचे अध्यक्ष स्थानिक आमदार, तर उपविभागीय अधिकारी (महसूल) सहअध्यक्ष असतील. तहसीलदार, गटविकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधीक्षक, इंडियन मेडिकल असोसिएशन व केमिस्ट-ड्रगिस्ट असोसिएशनचे प्रतिनिधी सदस्य असतील. कक्ष प्रमुख सदस्य सचिव म्हणून काम पाहतील.

जिल्हास्तरीय समितीचे अध्यक्ष पालकमंत्री, सहअध्यक्ष जिल्हाधिकारी, तर जिल्हा आरोग्य अधिकारी सदस्य सचिव असतील. तर, वैद्यकीय क्षेत्रातील दोन समाजसेवक अशासकीय सदस्य म्हणून या समितीचे काम पाहणार आहेत.

आरोग्य तज्ज्ञांची मदत घेणार

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, इंडियन मेडिकल असोसिएशन, महाराष्ट्र मेडिकल परिषद, स्थानिक वैद्यकीय संघटना, खासगी रुग्णालय येथील आरोग्य तज्ज्ञांची मदत घेणार आहेत. दुष्काळग्रस्त भागात आरोग्यशिबीरे आयोजित करून रुग्णांना औषधोपचार उपलब्ध करून दिले जाणार आहेत.

महिन्यातून दोन बैठका बंधनकारक

दोन्ही समित्यांनी महिन्यातून किमान दोन बैठका घ्यायच्या आहेत. दुर्गम, मोठी लोकसंख्या असलेले आणि आरोग्य सुविधांची कमतरता असलेले भाग ओळखून तेथे प्राधान्याने उपाययोजना केल्या जातील. पिण्याच्या पाण्याशी व उष्णतेशी संबंधित आजारांचा आढावा, आरोग्य शिबिरे, फिरती वैद्यकीय पथके आणि तज्ज्ञ डॉक्टरांच्या सेवांचे नियोजन समित्या करतील. महिला, बालके, ज्येष्ठ नागरिक तसेच मधुमेह व रक्तदाबग्रस्तांकडे विशेष लक्ष दिले जाईल.

अहवाल मंत्रालयाकडे

तालुका कक्ष दैनंदिन कामकाजाचा व शिबिरांचा अहवाल जिल्हा कक्षाकडे देईल. जिल्हा कक्ष सर्व तालुक्यांचे अहवाल एकत्र करून मंत्रालयातील मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाकडे सादर करेल.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून मुख्यमंत्री सहाय्यता निधीची यंत्रणा अधिक लोकाभिमुख करण्याच्या दृष्टीने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. तालुका स्तरावर कक्ष सुरू झाल्यामुळे दुष्काळग्रस्त भागातील गरजू रुग्ण वेळेत निदर्शनास येतील आणि त्यांना योग्य उपचार व आर्थिक मदत मिळवून देणे शक्य होईल. आरोग्य योजनांचा लाभ आणि आवश्यकतेनुसार मुख्यमंत्री सहाय्यता निधीची मदत यांचा समन्वय साधला जाईल. कोणताही गरजू रुग्ण आर्थिक अडचणीमुळे उपचारांपासून वंचित राहू नये, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे असे मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धमार्दाय रुग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले.

थोडक्यात

घनकचरा व्यवस्थापनातून स्वच्छतेचा संदेश, विद्यार्थ्यांनी घेतली स्वच्छतेची शपथ

राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे मार्गदर्शनपर व्याख्यान व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन



दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड

वाढते शहरीकरण आणि बदलती जीवनशैली यामुळे निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करण्याबाबत जनजागृती व्हावी, या उद्देशाने नूतन आदर्श आर्ट्स, कॉमर्स अँड श्रीमती म. ह. वेगड विज्ञान महाविद्यालय, उमरेड येथे राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे घनकचरा व्यवस्थापन विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी स्वच्छतेची सामूहिक शपथ घेत पर्यावरण संवर्धनाचा संकल्प केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अर्चना चौधरी होत्या. प्रमुख मार्गदर्शक गायत्री मराठे यांनी घनकचरा व्यवस्थापनाचे महत्त्व स्पष्ट करताना ओला व सुका कचरा वेगवेगळा करणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे, पुनर्वापराला प्रोत्साहन देणे आणि कचऱ्याची शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट लावणे आवश्यक असल्याचे सांगितले. स्वच्छता ही केवळ वैयक्तिक सवय नसून प्रत्येक नागरिकाची सामाजिक जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्राचार्य डॉ. अर्चना चौधरी यांनी स्वच्छ व सुंदर परिसर निर्मितीसाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग आवश्यक असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयासह आपल्या गावात आणि समाजात स्वच्छतेविषयी जनजागृती करून पर्यावरण संवर्धनासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. लोमेश बावनकुळे यांनी केले. संचालन दीपांश्या पुंड यांनी, तर आभार प्रदर्शन खुशी गुरले यांनी केले. यावेळी दिव्या मेहरकुरे, प्रतीक्षा सातपुते, अंकिता चहांडे, डॉ. हरिहर दहिकर, प्रा. साहिल मुंगले यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व स्वयंसेविका उपस्थित होते. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी विद्यार्थ्यांनी परिसर स्वच्छ ठेवणे, कचरा वर्गीकरण करणे, सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे आणि पर्यावरण संरक्षणासाठी सक्रिय सहभाग घेणे, अशी सामूहिक शपथ घेतली.

वक्तृत्व स्पर्धेतून पर्यावरण जनजागृती

दरम्यान, राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे ३ नोव्हेंबर रोजी घनकचरा व्यवस्थापन व पर्यावरण संवर्धन विषयावर वक्तृत्व स्पधेर्चे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत स्वच्छता, कचरा वर्गीकरण, पर्यावरण संरक्षण आणि सामाजिक जबाबदारी यावर आपले विचार मांडले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेची सवय, पर्यावरणाविषयी जागरूकता आणि सामाजिक बांधिलकी निर्माण करण्याचा संदेश देण्यात आला.

राष्ट्रसंतांच्या शब्दात सामर्थ्य होते : भूमिका धर्माळे



दै. सिंहवाणी वृत्त, श्रीरामपूर

बालपणी उन्मनी अवस्था प्राप्त राष्ट्रसंतांनी आजीवन अलौकिक कार्य केले. स्वातंत्र चळवळ, ग्रामस्वराज्य,परकीय आक्रमण प्रत्येक क्षणी त्यांच्या शब्दाने जागृती केली. देशाचे शेतकरी, शेतमजूर, कारखानदार, मालदार राजा, रंक, युवक, पुढारी, साधुसंत, महामंडलेश्वर, विदेशी लोक त्यांच्या शब्दांनी सर्वांना भुरळ घातली कारण त्यांच्या शब्दात सामर्थ्य होते आजही त्यांचे विचार सर्वांनी आचरणात आणण्याची नितांत गरज असून भारत देशासाठी आयुष्य समर्पित करणाऱ्या या महामानवास भारतरत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात यावे असे प्रतिपादन भूमिका धर्माळे हिने सामुदायिक प्रार्थनेत केले. श्रीगुरुदेव सेवामंडळ श्रीरामपूर वतीने पुसद तालुक्यात विविध ठिकाणी सर्वधर्मीय सामुदायिक प्रार्थना व भजन संध्या उपक्रमास उस्फुर्त प्रतिसाद मिळत असून यावेळी शासकीय इंजिनियर विरेंद्र क्षीरसागर यांच्या निवासस्थानी सामुदायिक प्रार्थना व भजन संध्या घेण्यात आली.

यावेळी तालुका सेवाधिकारी शिवशंकर नागरे,राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक यशवंत देशमुख, राष्ट्रीय कीर्तनकार आकाश ताविडे महाराज, ह.भ.प.सुधाकर कपटे, सारंग अडसड जितेंद्र किन्हेकर कासार समाजभूषण मोहन नागपूरकर,भीमराव वानखडे, मंडळाचे अध्यक्ष गणेश धर्माळे प्रामुख्याने उपस्थित होते सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते अधिष्ठान पूजन करण्यात आले त्यानंतर शर्वरी काळबांडे हिच्या आदेशानुसार शिस्तबद्ध सामुदायिक प्रार्थना घेण्यात आली. यावेळी प्रार्थनेचे महत्व विषद करतांना भूमिका पुढे म्हणाली की राष्ट्रसंत जगातील पहिले संत ज्यांनी ग्रामनाथास ग्रंथ अर्पण केला कारण त्याच्या श्रमास प्रतिष्ठा मिळावी, राष्ट्रसंतांनी तरुणांच्या मुखातील सिनेमा गीतांचे राष्ट्रीय गीतात परिवर्तन करून त्यांच्यातील आळस,अज्ञान, व्यसनांचा बीमोड करून राष्ट्रीय कार्यास प्रवृत्त केले, सर्व साधू संतांना एकत्र आणून देशात भरीव कार्य करण्याचे आवाहन केले त्यांचे जीवन कार्य सांगण्यास शब्द नव्हे आयुष्य अपुरे पडते.

त्यानंतर भजनांचा बहारदार कार्यक्रम संपन्न झाला,हार्मोनियम अशोक भगत महाराज,ऋषभ तोडसाम,यशवंत भगत तबला अनिल अस्वार, किसन गरडे खंजिरी सुरेश कदम, आकाश ताविडे महाराज साथसंगत पंजाब गडदे, कैलास मस्के, देवेश किन्हेकर, श्यामराव देशमाने पुंडलिक, भालेराव गजानन, गव्हाणकर, लक्ष्मण कदम महिला प्रतिनिधी कमल गडदे, मुक्ता काळबांडे,कस्तुरी धमार्ळे,रंजना किन्हेकर, शोभा सोनारे,मीना वानखेडे,अक्षरा किन्हेकर,डॉ. देवश्री काळबांडे, स्मिता धर्माळे, मीना क्षीरसागर यांनी केली. महाआरती, अल्पोपहार, राष्ट्रवंदना जयघोषाने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी असंख्य स्त्री पुरूष आबालवृद्ध मोठया संख्येने उपस्थित होते.

नदी-नाले सफाईसह मार्ग स्वच्छताच्या व्यवस्थेला अत्याधुनिक यंत्रसामग्रीचे बळ

महापौर यांच्या हस्ते १२ रोड स्वीपिंग अन् ४ चेन क्रॉलर एक्स्कॅव्हेटर मशीनचे लोकार्पण

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

शहराची स्वच्छता व्यवस्था अधिक सक्षम, गतिमान आणि आधुनिक करण्याच्या दृष्टीने नागपूर महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागाच्या ताफ्यात अत्याधुनिक यंत्रसामग्रीचा समावेश करण्यात आला आहे. यातील १२ रोड स्वीपिंग मशीन आणि ४ चेन क्रॉलर एक्स्कॅव्हेटर (पोकलेन) मशीनचे लोकार्पण मध्यवर्ती वर्कशॉप येथे महापौर श्रीमती निता ठाकरे यांच्या हस्ते शुक्रवारी(ता.०६) करण्यात आले.



यावेळी आमदार कृष्णा खोपडे, आयुक्त डॉ. विपिन, उपमहापौर लीला हाथीबेड, सत्तापक्ष नेते नरेंद्र (बाल्या) बोरकर विरोधी पक्षनेते संजय महाकाळकर, आरोग्य सेवा समितीच्या सभापती मनिषा अतकरे, झोन सभापती महेश्वरी बेसेन, नगरसेविका सुजाता कोंबडे, भावना लोणारे, मंगला मस्के, ज्येष्ठ नगरसेवक संदीप गवई, श्रीकांत आगलावे, मनोज साबळे, प्रमोद ठाकूर, सुहास मानवटकर, उपायुक्त राजेश भगत, सहाय्यक आयुक्त प्रमोद वानखेडे, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, स्वच्छता निरीक्षक लोकेश बासनवर आणि सुरेश खरे यांच्यासह जेसीबीचे कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी महापौर निता ठाकरे यांनी शहर स्वच्छतेसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यावर भर दिला. या यंत्रसामग्रीवर काम करणाऱ्या मनुष्यबळाला योग्य आणि आवश्यक प्रशिक्षण देण्यात यावे. अशा सूचना त्यांनी यावेळी दिली. केंद्र व राज्य शासनाच्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान २.० अंतर्गत नागपूर महानगरपालिकेला १२ रोड स्वीपिंग मशीन उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या मशीनची खरेदी अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (२.०) यांच्या माध्यमातून करण्यात आली आहे. या १२ मशीनसाठी एकूण ५.५८ कोटींचा रुपयांचा निधी खर्च करण्यात आला असून, प्रत्येक मशीनची किंमत ४६.५० लाख रुपये इतकी आहे. या रोड स्वीपिंग मशीनची क्षमता ३ क्यूबिक मीटर इतकी आहे. या मशीनची निर्मिती बॅक्सी लिमिटेड या कंपनीद्वारे करण्यात आली असून, त्यासाठी टाटा मोटर्सचे चेसिस वापरण्यात आले आहे. या आधुनिक मशीनच्या माध्यमातून शहरातील प्रमुख आणि महत्त्वाच्या रस्त्यांची यांत्रिकी पद्धतीने अधिक जलद व प्रभावी साफसफाई करणे शक्य होणार आहे. रस्त्यांवरील धूळ, माती आणि कचरा काढण्यासाठी या मशीनचा उपयोग होणार असून, शहराच्या स्वच्छतेच्या दर्जात सुधारणा होण्यास मदत होणार आहे.

अरुंद नदी-नाल्यांच्या स्वच्छतेसाठी ४ पोकलेन मशीन

शहरातील अरुंद नदी-नाले तसेच पुलाखाली साचलेला कचरा यांत्रिकी पद्धतीने साफ करण्याच्या उद्देशाने नागपूर महानगरपालिकेने ४ चेन क्रॉलर एक्स्कॅव्हेटर (पोकलेन) मशीन खरेदी केल्या आहेत. या मशीनची खरेदी जिल्हा नियोजन समिती, नागपूर जिल्हा यांच्याकडून सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ अंतर्गत प्राप्त निधीतून करण्यात आली आहे. प्रत्येक मशीनची क्षमता ५ टन असून, त्याची बकेट क्षमता ०.२२ क्यूबिक मीटर इतकी आहे. प्रत्येक मशीनची किंमत रु. ३७ लाख ८० हजार असून, चार मशीनच्या खरेदीसाठी एकूण १ कोटी ५१ लाख २० हजार रुपये इतका खर्च करण्यात आला आहे.

या मशीनचा पुरवठा मेसर्स जी. के. ऑटोव्हील्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्यामार्फत करण्यात आला आहे. नदी-नाल्यांमध्ये तसेच पुलाखाली साचणारा कचरा आणि गाळ काढण्यासाठी या मशीनचा उपयोग होणार आहे. विशेषतः अरुंद भागांमध्ये यांत्रिकी पद्धतीने स्वच्छता करणे अधिक सुलभ होणार असून, पाण्याचा नैसर्गिक प्रवाह सुरळीत ठेवण्यासाठीही या यंत्रसामग्रीची मदत होणार आहे.

राजयुवा प्रकाशनाची साहित्यभरारी : पुण्यात रंगले राजयोग कवी संमेलन; सहा पुस्तकांचे प्रकाशन

दै. सिंहवाणी वृत्त, पुणे

राजयुवा प्रकाशन आणि काव्ययोग काव्य संस्था, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने कोजागिरी पौर्णिमेनिमित्त राजयोग कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले. या साहित्यिक सोहळ्यात सहा पुस्तकांचे प्रकाशन, बक्षीस वितरण आणि पुरस्कार वितरण समारंभ उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस होते. कवी संमेलनाचे अध्यक्ष म्हणून गझलकार बाळासाहेब गिरी उपस्थित होते, तर डॉ. शंकर अडाणी यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले.



प्रमुख उपस्थितीमध्ये बालसाहित्यिका वसुधा नाईक, सायको-सोशल कौन्सेलर सोनाली फडके, बालसाहित्यिका ललिता सबनीस, ज्येष्ठ लेखिका हेमलता गीते आणि पोलीस आयुक्त मोहन जाधव आदी मान्यवर सहभागी झाले होते.

यावेळी कवी भालचंद्र खरळकर लिखित खिंडवाट हा कवितासंग्रह, अर्चना पाटील लिखित संसाराचा गाडा हा कथासंग्रह, वसुधा नाईक आणि योगेश हरणे संपादित साहित्यप्रभा हा दिवाळी अंक, गौरव पुंडे आणि योगेश हरणे संपादित माणुसकीची सावली हा साहित्यसंग्रह, विकास घोणे लिखित शिंपल्यातले मोती हा कथासंग्रह तसेच योगेश हरणे संपादित महाराष्ट्राचा लाडका कवी या पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस यांनी प्रत्येक पुस्तकातील आशयाविषयी सविस्तर विवेचन केले. साहित्य नेमके कसे असावे, त्यात वैचारिकता कशी असावी आणि साहित्याने समाजाला कोणती दिशा द्यावी, याविषयी त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांच्या विचारपूर्ण विवेचनातून साहित्यिकांना नवी दृष्टी मिळाली. राजयुवा प्रकाशनाच्या माध्यमातून आतापर्यंत १२५ पुस्तके प्रकाशित झाल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्रीराम घाडे, करण सोळसे, राजयुवा प्रकाशनाचे गौरव पुंडे, योगेश हरणे आणि मयुरी लायगुडे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे निवेदन गजानन उफाडे यांनी केले. पुस्तक प्रकाशन, वैचारिक मार्गदर्शन आणि काव्य सादरीकरण अशा त्रिवेणी संगमातून राजयोग कवी संमेलन उत्साहपूर्ण वातावरणात

धनत्रयोदशीला रोकडे ज्वेलर्सच्या शोरूममध्ये ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद!

'ये है नया रोकडे' अभियानाला मिळतोय शानदार प्रतिसाद

G.O.A.T. OFFER ठरतोय आकर्षणाचा केंद्रबिंदू - सोन्याच्या दागिन्यांच्या मेकिंग चार्जेसवर ४०% पर्यंत, १८ KT वर ६०% आणि डायमंड ज्वेलरीच्या मेकिंग चार्जेसवर १००% पर्यंत सूट!, ५% पासून सुरू होणारे मेकिंग चार्जेस, १८ कॅरेट गोल्ड, डायमंड आणि फॅन्सी डायमंड ज्वेलरीचे आकर्षक कलेक्शन तसेच सोने-चांदी जिंकण्याच्या रोमांचक संधींमुळे खरेदीचा उत्साह द्विगुणित; धनत्रयोदशीला सकाळी ८.३० वाजल्यापासून ग्राहकांच्या स्वागतासाठी सर्व शोरूम खुले

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

धनत्रयोदशीच्या पवित्र पर्वानिमित्त विदर्भातील प्रतिष्ठित ज्वेलरी ब्रँड रोकडे ज्वेलर्सच्या सर्व शोरूममध्ये ग्राहकांचा प्रचंड उत्साह पाहायला मिळत आहे. सोने, चांदी आणि हिऱ्यांच्या दागिन्यांच्या खरेदीसाठी मोठ्या संख्येने ग्राहक आपल्या कुटुंबीयांसह शोरूममध्ये दाखल होत आहेत. ग्राहकांचा हा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि वाढता उत्साह पाहता रोकडे ज्वेलर्सचे विशेष 'ये है नया रोकडे' अभियान यंदा विशेष आकर्षणाचे केंद्र ठरत आहे.

सन १९०२ पासून ग्राहकांच्या विश्वासाचा वारसा जपत आलेल्या रोकडे ज्वेलर्सने यंदाच्या धनत्रयोदशीला परंपरा, आधुनिकता आणि सणासुदीच्या खास ऑफर्सचा अनोखा संगम सादर केला आहे. ग्राहकांची आवड, गरज आणि बजेट लक्षात घेऊन ब्रँडतर्फे आकर्षक दागिन्यांच्या कलेक्शनसोबत अनेक शानदार ऑफर्स सादर करण्यात आल्या आहेत. विशेषतः G.O.A.T. OFFER ने ग्राहकांमधील खरेदीचा उत्साह अधिक वाढवला आहे.

G.O.A.T. OFFER – GREATEST OF ALL TIME, यंदाच्या धनत्रयोदशीचे सर्वात मोठे आकर्षण!

यंदा रोकडे ज्वेलर्सतर्फे सादर करण्यात आलेली G.O.A.T. OFFER (GREATEST OF ALL TIME) ही ग्राहकांसाठी विशेष आकर्षण ठरत आहे. ११ नोव्हेंबर २०२६ PARYANT या कालावधीत सुरू असलेल्या या विशेष ऑफरअंतर्गत ग्राहकांना अनेक आकर्षक लाभ मिळत आहेत.

ग्राहकांसाठी खास सणासुदीच्या ऑफर्स

- FLAT ४०% सूट - २२ KT सोन्याच्या दागिन्यांच्या मेकिंग चार्जेसवर.
- FLAT ६०% सूट - १८ KT सोन्याच्या दागिन्यांच्या मेकिंग चार्जेसवर.
- FLAT १००% सूट - डायमंड ज्वेलरीच्या मेकिंग चार्जेसवर.
- जुन्या सोन्याच्या मूल्यावर १०१% पर्यंत लाभ - जुन्या सोन्याच्या एक्सचेंजवर विशेष फायदा.

या आकर्षक ऑफर्ससोबतच सोन्याच्या दागिन्यांवर ५% पासून सुरू होणारे मेकिंग चार्जेस हा पर्यायदेखील ग्राहकांसाठी विशेष आकर्षण ठरत आहे. सुंदर डिझाइन्स, उत्तम व्हरायटी आणि सणासुदीतील विशेष बचत यामुळे ग्राहक आपल्या आवडीचे दागिने खरेदी करण्यासाठी रोकडे ज्वेलर्सला प्राधान्य देत आहेत.

नियम व अटी लागू

प्रत्येक आवड आणि प्रत्येक पिढीसाठी आकर्षक दागिन्यांचे कलेक्शन.

रोकडे ज्वेलर्सच्या शोरूममध्ये यंदाच्या धनत्रयोदशीला ग्राहकांना पारंपरिक आणि आधुनिक डिझाइन्सचा सुंदर संगम अनुभवायला मिळत आहे. २२ कॅरेट आणि १८ कॅरेट गोल्ड ज्वेलरीसोबत डायमंड आणि फॅन्सी डायमंड ज्वेलरीची आकर्षक रेंजदेखील ग्राहकांच्या पसंतीस उतरत आहे.

पारंपरिक सोन्याचे दागिने असोत, रोजच्या वापरासाठी हलके आणि स्टायलिश दागिने असोत किंवा खास प्रसंगांसाठी सुंदर डायमंड ज्वेलरी असो, प्रत्येक वयोगटातील आणि प्रत्येक आवडीच्या ग्राहकांसाठी येथे आकर्षक पर्याय उपलब्ध आहेत.

यासोबतच खरेदीदरम्यान सोने आणि चांदी जिंकण्याच्या रोमांचक संधींमुळे सणासुदीची खरेदी अधिकच खास आणि आनंददायी ठरत आहे.

धनत्रयोदशीला सकाळी ८.३० वाजल्यापासून ग्राहकांच्या स्वागतासाठी सर्व शोरूम खुले

धनत्रयोदशीच्या विशेष पर्वानिमित्त ग्राहकांची सोय आणि खरेदीचा उत्साह लक्षात घेऊन रोकडे ज्वेलर्सची सर्व शोरूम सकाळी ८.३० वाजल्यापासून ग्राहकांच्या स्वागतासाठी खुली.



या विशेष व्यवस्थेचा उद्देश ग्राहकांना आपल्या कुटुंबीयांसह सोयीस्कर पद्धतीने खरेदी करता यावी, आवडीचे दागिने निवडता यावेत आणि शुभमुहूर्तावर धनत्रयोदशीचा सण आनंदाने साजरा करता यावा हा आहे.

नागपूरपासून विदर्भातील प्रमुख शहरांपर्यंत - रोकडे ज्वेलर्स तुमच्या विश्वासाच्या अधिक जवळ

सन १९०२ पासून विदर्भवासीयांचा विश्वास संपादन करणाऱ्या रोकडे ज्वेलर्सने आपल्या भक्कम उपस्थितीद्वारे या भागातील अधिकाधिक कुटुंबांपर्यंत आपल्या सेवा पोहोचवल्या आहेत.

नागपूरमधील इतवारी सराफा, इतवारी येथील नवीन शोरूम, महाल आणि लक्ष्मीनगर,कोराडी, हिंगणा रोड यांसह भंडारा आणि गोंदिया येथेही रोकडे ज्वेलर्स ग्राहकांच्या सेवेत उपलब्ध आहे. तसेच चंद्रपूर आणि गडचिरोली येथे नवीन शोरूमच्या माध्यमातून ब्रँड आपला विस्तार अधिक व्यापक करत आहे. ब्रँडचा उद्देश केवळ दागिन्यांची विक्री करणे नसून प्रत्येक ग्राहकाला उत्तम गुणवत्ता, पारदर्शकता, आकर्षक डिझाइन्स आणि खरेदीचा अविस्मरणीय अनुभव देणे हा आहे. ग्राहकांचा उत्साह आणि विश्वासाबद्दल संचालक पारस रोकडे यांनी व्यक्त केली कृतज्ञता या प्रसंगी रोकडे ज्वेलर्सचे संचालक पारस रोकडे यांनी समस्त विदर्भवासीयांचे आणि ग्राहकांचे आभार व्यक्त करताना सांगितले.

'धनत्रयोदशी हा भारतीय कुटुंबांसाठी केवळ सोने-चांदी खरेदी करण्याचा दिवस नाही, तर तो परंपरा, विश्वास, समृद्धी आणि नव्या सुरुवातीचे प्रतीक आहे. आमच्यासाठी दागिने म्हणजे केवळ अलंकार नसून ते कुटुंबाच्या भावना, नाती, संस्कार आणि पिढ्यान्पिढ्यांच्या आठवणींशी जोडलेले असतात.

सन १९०२ पासून रोकडे ज्वेलर्सला विदर्भवासीयांकडून मिळत आलेले प्रेम, विश्वास आणि आपलेपणा ही आमच्यासाठी सर्वात मोठी उपलब्धी आणि प्रेरणा आहे. धनत्रयोदशीच्या निमित्ताने ग्राहकांचा उत्साह आणि आमच्यावरील त्यांचा विश्वास पाहून आम्हाला मनापासून आनंद होतो. आमचे ग्राहक हीच आमची खरी ओळख आहे.

यंदा 'ये है नया रोकडे' या अभियानांतर्गत आम्ही ग्राहकांसाठी आकर्षक दागिन्यांचे कलेक्शन, ५% पासून सुरू होणारे मेकिंग चार्जेस आणि G.O.A.T. OFFER सारख्या विशेष ऑफर्स सादर केल्या आहेत. २२ KT गोल्ड ज्वेलरीच्या मेकिंग चार्जेसवर ४०%, १८ KT गोल्ड ज्वेलरीवर ६०% आणि डायमंड ज्वेलरीच्या मेकिंग चार्जेसवर १००% सूट तसेच जुन्या सोन्याच्या मूल्यावर १०१%* पर्यंत विशेष लाभ देण्याचा आमचा प्रयत्न आहे. यामुळे आमच्या ग्राहकांना या सणासुदीच्या काळात त्यांच्या आवडीचे दागिने अधिक चांगल्या लाभांसह खरेदी करता येतील.

प्रत्येक ग्राहकाला त्याची आवड, गरज आणि बजेट यानुसार सर्वोत्तम दागिने उपलब्ध करून देणे हा आमचा नेहमीच प्रयत्न असतो. आमच्यासाठी ग्राहकांचे समाधान सर्वात महत्त्वाचे आहे.

नागपूरमधील इतवारी सराफा, इतवारी येथील नवीन शोरूम, महाल आणि लक्ष्मीनगरपासून भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोलीपर्यंत विदर्भातील अधिकाधिक कुटुंबांपर्यंत रोकडे ज्वेलर्सचा वारसा, गुणवत्ता आणि विश्वास पोहोचवण्याचा आमचा प्रयत्न आहे.

मी समस्त विदर्भवासीयांना, आमच्या जुन्या तसेच नवीन ग्राहकांना आपल्या कुटुंबीयांसह रोकडे ज्वेलर्सच्या शोरूममध्ये येण्याचे मनापासून आमंत्रण देतो. तुमचा विश्वास हाच आमचा वारसा आहे आणि तुमचा आनंद हीच आमची सर्वात मोठी कमाई आहे. समस्त विदर्भवासीयांना धनत्रयोदशी आणि दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

'ये है नया रोकडे' - ग्राहकांचा विश्वास, हीच आमची ओळख!